❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती गुरुवार, दि. ०१ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २७६ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



‘त्या’ मफलरवाल्याचा पर्दाफाश १० तारखेला करणार!

रोहित पवारांचा सरकारला थेट इशारा : पुढच्या कॅबिनेटमध्ये हेक्टरी १ लाख न दिल्यास समृद्धी महामार्ग रोखणार

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

"राज्यातील शेतकरी आणि शेतमजूर 1972 पेक्षाही भीषण अशा दुष्काळाच्या खाईत लोटला गेला आहे. केंद्राच्या 'इस्रो'च्या (ISRO) संकेतस्थळावर कोणत्या तालुक्यात पावसाची तूट आहे हे स्पष्ट दिसत असताना, हे सरकार मात्र गाढ झोपले होते. सत्ताधारी आमदारांनी गोंधळ घातल्यानंतर घाईगडबडीत 40 तालुक्यांची दुसरी यादी जाहीर केली. मात्र, केवळ कागदोपत्री दुष्काळ जाहीर करून चालणार नाही; पुढच्या कॅबिनेट बैठकीत शेतकऱ्यांना हेक्टरी 1 लाख रुपये आणि मजुरांना 25 हजार रुपयांची मदत जाहीर झाली नाही, तर आम्ही शेतकरी आणि मजुरांना घेऊन समृद्धी महामार्ग अडवल्याशिवाय राहणार नाही," असा थेट आणि आक्रमक इशारा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी दिला आहे.

नाशिकमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंती सोहळ्यास उपस्थित राहिल्यानंतर रोहित पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. खासदार सुप्रिया सुळे या नवी दिल्लीतील 'इंडिया' आघाडीच्या महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित असल्याने त्यांच्या जागी नाशिकला आल्याचे सांगत, रोहित पवारांनी उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे आणि जळगाव या तीन दुष्काळग्रस्त जिल्ह्यांच्या पाहणी दौऱ्यावर रवाना होत असल्याचे सांगितले. या पत्रकार परिषदेत त्यांनी दुष्काळ, एमपीएससी विद्यार्थ्यांचे प्रश्न, कायदा-सुव्यवस्थेचे तीन-तेरा, दादांच्या मृत्यूतील संशयित मफलरवाला आणि नाशिकमधील भ्रष्टाचारावर चौफेर हल्ला चढवला.

राज्य सरकारच्या दुष्काळ जाहीर करण्याच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढताना रोहित पवार म्हणाले, "ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून जर सरकारने जमिनीवर नीट सर्वेक्षण केले असते, तर खरी परिस्थिती समोर आली असती. मात्र, सरकार झोपलेले होते. जनक्षोभ आणि सत्ताधारी आमदारांचा दबाव वाढल्याने त्यांनी घाईघाईने निर्णय घेतले. उशिरा का होईना सरकारने आणखी 40-43 तालुक्यांचा समावेश केला, याबद्दल आभार; पण आमची मूळ मागणी सरसकट दुष्काळ जाहीर करण्याची होती. अजूनही अनेक भाग वंचित आहेत."

"आम्ही सुरुवातीला 50 हजार रुपये हेक्टरी मदतीची मागणी करत होतो. पण 16-17 जिल्ह्यांत हजारो शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर हे स्पष्ट झाले आहे की, गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीची नुकसानभरपाई मिळालेली नाही आणि यंदा रब्बीही हातून गेली आहे. त्यामुळे शरद पवार साहेबांच्या पत्रानुसार शेतकऱ्यांना हेक्टरी किमान 1 लाख रुपये आणि शेतमजूर कुटुंबाला 25 हजार रुपयांची रोख मदत दिलीच पाहिजे. पुढील कॅबिनेटमध्ये हा निर्णय न झाल्यास समृद्धी महामार्ग पूर्णपणे ठप्प केला जाईल."



तो मफलर कोणाचा? 10 तारखेला नाव जाहीर करणार!

अजितदादा यांच्या निधनासंदर्भात आणि व्हीएसआर कंपनीच्या संशयास्पद तपासावर केलेल्या विधानावर रोहित पवारांनी गूढ वाढवले. "मी मफलर घालणाऱ्या सामान्य नेत्यांबद्दल बोलत नाहीये. एका विशिष्ट कार्यक्रमात ज्या व्यक्तीने तो मफलर घातला होता, ती व्यक्ती व्हीएसआरला वाचवण्यासाठी आणि पोलिसांच्या निष्पक्ष तपासावर दबाव आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. ती व्यक्ती नेमकी कोण आहे, याचा संपूर्ण पर्दाफाश मी येत्या 10 ऑक्टोबरला पुराव्यानिशी करणार आहे."

पालकमंत्री दादा भुसे यांनी जाहीर केलेल्या 10 वी आणि 12वीच्या परीक्षा शुल्क माफीवर टीका करताना ते म्हणाले, "10 वी-12 वीचे परीक्षा शुल्क म्हणजे केवळ 100 रुपयांची सवलत आहे. गेल्या वेळी अतिवृष्टीदरम्यान केवळ 30 कोटी रुपये माफ करून शासनाने पाठ थोपटून घेतली होती. या 100 रुपयांनी संकटात सापडलेल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या मुलांचे काय भले होणार?"

"1 लाख कोटींचा निरुपयोगी शक्तिपीठ महामार्ग तातडीने रद्द करा आणि त्या पैशातून दुष्काळग्रस्त भागातील शाळा, कनिष्ठ महाविद्यालये आणि वरिष्ठ महाविद्यालयांतील सर्व विद्यार्थ्यांची संपूर्ण शैक्षणिक फी माफ करा. अन्यथा दुष्काळामुळे ग्रामीण भागातील हजारो मुले शिक्षणापासून वंचित राहतील."

एमपीएससी (MPSC) परीक्षा सुधारणा आणि विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर रोहित पवारांनी सविस्तर भूमिका मांडली. "पुणे पोलीस आयुक्तांच्या मध्यस्थीने 15-16 आंदोलक विद्यार्थी प्रतिनिधी आज दुपारी 2 वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत आहेत. आज मुख्यमंत्री विद्यार्थ्यांची बाजू घेतात की आपल्या मित्रांची, हे स्पष्ट होईल."

थोडक्यात...

दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीत मंत्री राणे यांचा समावेश

मुंबई : दैनिक संध्या

राज्यातील अपुऱ्या पावसामुळे उद्भवलेल्या दुष्काळजन्य परिस्थितीचा वेळोवेळी आढावा घेऊन उपाययोजना सुचविणे आणि परिस्थितीचे संनियंत्रण करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीत मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाने २९ सप्टेंबरला याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या ११ सदस्यीय मंत्रिमंडळ उपसमितीमध्ये मंत्री नितेश राणे यांचा समावेश करण्याचा निर्णय २९ सप्टेंबरला झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. यामुळे दुष्काळजन्य परिस्थितीच्या आढाव्यात मत्स्यव्यवसायाशी संबंधित बाबींचाही यापुढे समावेश होणार आहे. राज्यात अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीचा आढावा घेणे, आवश्यक उपाययोजना सुचविणे तसेच परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ही उपसमिती कार्य करणार आहे. या पार्श्वभूमीवर मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री म्हणून राणे यांचा समितीत समावेश महत्वाचा ठरला आहे.

सामाजिक परिवर्तनासाठी पुढाकार घ्यावा – राज्यपाल

मुंबई : दैनिक संध्या

क्षयरोग (टीबी) हा केवळ आजार नसून सामाजिक समस्या आहे. टीबीमुक्त मुंबईसाठी शासनाच्या प्रयत्नांसोबत समाजातील प्रत्येक घटकाने, विशेषतः तरुणांनी पुढाकार घेऊन जनजागृतीचे दूत बनावे, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. भवन्स कॉलेज, अंधेरी पश्चिम येथे मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.), बृहन्मुंबई महानगरपालिका आणि भवन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'टीबीमुक्त मुंबई जनजागृती पदयात्रेत' राज्यपाल सहभागी झाले. यावेळी राज्यपालांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की, देशाचे भविष्य सरकारी कार्यालयांमध्ये नव्हे, तर शाळा-महाविद्यालये, प्रयोगशाळा आणि तरुणांच्या कार्यातून घडत आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरसोबतच मजबूत आणि संवेदनशील समाज निर्माण करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. चांगल्या समाजाशिवाय व्यक्तीचे चांगले भविष्य घडू शकत नाही, असे त्यांनी नमूद केले. टीबी उपचाराने पूर्णपणे बरा होऊ शकतो. मात्र, आजही अनेक नागरिकांमध्ये या आजाराबाबत पुरेशी माहिती नसल्याने तसेच सामाजिक कलंकाच्या भीतीमुळे रुग्ण आजार लपवतात. त्यामुळे वेळेवर तपासणी, योग्य उपचार आणि औषधांचा नियमित वापर याबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे.


दिव्या शिंदेची पोलीस कोठडी वाढली

डॉ. गायकवाड हल्ला-खंडणी प्रकरणात १७ जणांचा सहभाग निष्पन्न

■ पुणे (दै. संध्या)

पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. विद्याधर गायकवाड यांच्यावर झालेला जीवघेणा हल्ला आणि पाच लाख रुपयांच्या खंडणीप्रकरणात हल्ल्यासाठी आठ दुचाकींचा वापर करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. हल्ल्यात वापरलेली हत्यारे, मोबाइल फोन तसेच अन्य डिजिटल पुरावे जप्त करणे बाकी असल्याने 'बिग बॉस' फेम दिव्या शिंदेच्या पोलिस कोठडीत वाढ करण्याची मागणी पोलिसांनीन्यायालयात केली. त्यानुसार तिच्या पोलिस कोठडीत दोन ऑक्टोबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमित कुलकर्णी यांनी बुधवारी हा आदेश दिला.

या हल्ला-खंडणी प्रकरणात १७ जणांचा सहभाग निष्पन्न झाला आहे. दरम्यान, दिव्या शिंदेला बुधवारी न्यायालयात हजर करण्यात आले. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य तपासातून हल्ल्यात सहभागी असलेल्या आरोपींबाबत माहिती मिळाल्याचे पोलिसांनी न्यायालयात सांगितले. आठ दुचाकींवरून आरोपी घटनास्थळी आल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. तपास पथकाने 'ब्लू नाईल' हॉटेलचे सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहे. या फुटेजमध्ये आप्पा ढमढेरे, डॉ. गायकवाड



आणि त्यांच्या मुलामध्ये पाच लाख रुपयांच्या खंडणीबाबत बैठक झाल्याचे दिसत असल्याचा दावा पोलिसांनी केला. आप्पा ढमढेरे (रा. पिंपरी), निखिल शिंदे, निखिलची होणारी पत्नी, ताहीर (रा. कोंढवा) यांच्यासह अन्य १३ अनोळखी व्यक्तींचा या प्रकरणात सहभाग निष्पन्न झाला आहे. हल्ल्यात वापरलेले लोखंडी हत्यार, लाकडी दांडके, स्वाक्षऱ्यांचे नमुने, हस्तलिखित मजकूर तसेच हल्ल्याचे चित्रीकरण करणारा मोबाइल फोन अद्याप जप्त करण्यात आलेला नाही. या वस्तू जप्त करण्याबरोबरच गुन्ह्याच्या कटाचा उलगडा करण्यासाठी दिव्या शिंदेची पोलिस कोठडी वाढविणे आवश्यक असल्याचे सरकारी वकील ॲड. आम्रपाली कस्तुरे यांनी न्यायालयात सांगितले. मूळ तक्रारदार यांच्यावतीने ॲड. शिवम निंबाळकर यांनी बाजू मांडली.

सोमेश्वर कारखान्यासाठी राष्ट्रवादी अन् शिवसेनेची युती; पुरुषोत्तम जगतापांच्या बंडामुळे भाजपही मैदानात

■ पुणे (दै. संध्या)

अजित पवारांच्या निधनानंतर बारामती सोमेश्वर साखर कारखान्याची पहिली निवडणूक होत असून राजकीय वर्तुळात ही निवडणूक लक्षवेधी ठरत आहे. यंदा येथील निवडणुकीत अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शिवसेनेची युती झाली असून पक्षाचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी माध्यमांना माहिती दिली. कारखान्याच्या निवडणुकीसाठी उमेश पाटील यांच्याकडून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे 21 उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादीतून बंड केलेल्या पुरुषोत्तम जगताप यांनीही स्वतंत्र पॅनेल उभा केला असून युगेंद्र पवार यांच्या नेतृत्वात शरद पवारांची राष्ट्रवादी मैदानात आहे. त्यामुळे, अजित पवारांच्या निधनानंतरची सोमेश्वर साखर कारखान्याची निवडणूक तिरंगी होत असल्याचं स्पष्ट झालं आहे.

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादीकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यामध्ये, बंड केलेल्या पुरुषोत्तम जगताप यांना देखील राष्ट्रवादीने उमेदवारी दिली आहे. मात्र, दुसरीकडे पुरुषोत्तम जगताप यांनी स्वंतत्र पॅनल उभारुन लढण्याची तयारी सुरू केली आहे. तर, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या



निवडणुकीत पुन्हा एकदा राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी असा संघर्ष पाहायला मिळत आहे. दोन्ही राष्ट्रवादीसोबत भाजप देखील या निवडणुकीच्या रिंगणामध्ये उतरले आहे.

राष्ट्रवादीचे बंडखोर पुरुषोत्तम जगताप यांना घेऊन भाजपने पॅनेल उभं केलं आहे, तर भाजपने पुरंदर मधील शरद पवार गटाचे दोन नेते देखील सोबत घेतले आहेत. त्याच्यामुळे पुन्हा एकदा राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी विरुद्ध भाजप अशी तिरंगी लढाई सोमेश्वर कारखान्याच्या निवडणुकीच्या अनुषंगाने पाहायला मिळेल. दरम्यान, अजित पवारांच्या राष्ट्रवादीला एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेनं साथ दिली असून राष्ट्रवादी आणि शिवसेनेची युती झाली आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे पुरंदर तालुक्यातील नेते हे भाजप आणि पुरुषोत्तम जगताप यांच्यासोबत गेले आहेत. तर, युगेंद्र पवारांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे स्वतंत्र पॅनेल उभं केलं आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आजचा शेवटचा दिवस होता आणि या शेवटच्या दिवशी तीन पॅनल या निवडणुकीच्या रिंगणामध्ये उतरले आहेत. त्यामुळे, सोमेश्वर साखर कारखान्याची निवडणूक रंगतदार आणि लक्षवेधी बनली आहे.

दरम्यान, अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत बंड केल्यानंतर पुरुषोत्तम जगताप यांनी भाजपसोबत एकत्र येत स्वतंत्र पॅनेल उभा केला आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेसकडून परिपत्रक काढण्यात आलं असून अजित पवारांच्या नावाचा आणि फोटोचा वापर कुटुंबीयांच्या परवानगीशिवाय कोणीही करू नये, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणात कुटुंबीय आक्रमक

गुन्हेगारांचे नाव FIR मध्ये टाकल्याशिवाय गर्दी हटणार नाही- संजय राऊत

■ ठाणे (दै. संध्या)

ठाण्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांची मंगळवारी रात्री गोळ्या झाडून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे ठाण्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. मानपाडा परिसरातील क्लस्टर डेव्हलपमेंट आणि राजकीय वर्चस्वाच्या वादातून ही हत्या झाल्याचा संशय व्यक्त होत असून, पूर्णेकर कुटुंबीयांनी ठाण्याच्या माजी महापौर मिनाक्षी शिंदे आणि त्यांचे पती राजेंद्र शिंदे यांच्यावर या हत्येचे सूत्रधार असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांच्यासह खासदार संजय राऊत यांनी पूर्णेकर कुटुंबीयांची भेट घेतली आहे. तसेच पोलिस ठाण्यात जाऊन त्यांनी पोलिस अधिकाऱ्यांशी देखील या प्रकरणी चर्चा केली आहे.

यावेळी आदित्य ठाकरे यांनी पोलिस अधिकाऱ्यांना मीनाक्षी शिंदे व राजेंद्र शिंदे यांचे नाव एफआयआरमध्ये नमूद करून घेण्याची मागणी केली आहे. तसेच मीनाक्षी शिंदे व राजेंद्र शिंदे यांना संरक्षण देण्यात आल्याचा दावाही करण्यात आला. यावर आक्षेप घेत पूर्णेकर कुटुंबीयांसह



ठाकरे व राऊत यांनीही आक्षेप नोंदवला आहे. तसेच पूर्णेकर कुटुंबीयांच्या मागणीनुसार मुख्य संशयित आरोपीला अटक करण्याची मागणी संजय राऊत यांनी केली आहे.

संजय राऊत यांनी म्हटले की, ताबडतोब कारवाई केली नाही तर हा मॉब घेऊन आम्ही संशयित आरोपींच्या घरावर जाऊ. त्यामुळे तातडीने कारवाई करून संशयित आरोपींना तातडीने अटक करावी आणि पुढील कारवाई सुरू करावी, अशी मागणी राऊत यांनी केली आहे.

कापूरबावडी पोलिस ठाण्याबाहेर पूर्णेकर समर्थक आणि कुटुंबीयांचा मोठा जमाव जमला आहे. पोलिसांनी समर्थकांसह कुटुंबीयांना पोलिस ठाण्याच्या गेटवरच अडवले आहे. मुख्य आरोपींना अटक होईपर्यंत प्रदीप पूर्णेकर यांचा मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका कुटुंबीयांनी घेतली आहे. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, कापूरबावडी पोलिस ठाण्याबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरम्यान, प्रदीप पूर्णेकर यांचा मृतदेह शवविच्छेदनानंतर जे. जे. रुग्णालयातून ठाण्यात आणण्यात येणार आहे.

कोहली वनडे क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर; गिल पहिल्या, रोहित चौथ्या क्रमांकावर

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

विराट कोहली ICCच्या वनडे फलंदाजांच्या क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या वनडेत नाबाद 139 धावांची खेळी केल्याचा त्याला फायदा झाला.

कोहलीचे आता 796 रेटिंग पॉइंट्स आहेत. तो अव्वल स्थानावर असलेल्या भारतीय कर्णधार शुभमन गिलपेक्षा केवळ 20 पॉइंट्स मागे आहे. क्रमवारी दर आठवड्याला बुधवारी जाहीर केली जाते. 27 सप्टेंबर रोजी तिरुवनंतपुरम येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या वनडेत कोहलीने 88 चेंडूंवर नाबाद 139 धावा केल्या होत्या. हे त्याच्या वनडे कारकिर्दीतील 55वे शतक होते. याच खेळीदरम्यान त्याने वनडे क्रिकेटमध्ये 15 हजार धावाही पूर्ण केल्या. सचिन तेंडुलकरनंतर हा टप्पा गाठणारा तो दुसरा फलंदाज ठरला. भारताने हा सामना 8 विकेट्सने जिंकला.

फलंदाजांच्या क्रमवारीतील टॉप-4 मध्ये 3 भारतीय फलंदाजांचा समावेश आहे. शुभमन गिलनेही वेस्ट इंडिजविरुद्ध शतक झळकावले होते. त्याने 110 धावांची खेळी केली. यानंतर गिल 816 रेटिंग पॉइंट्ससह पहिल्या क्रमांकावर आहे. कोहली दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे.

कोहलीने न्यूझीलंडच्या डॅरिल मिचेलला मागे टाकले. तो 794 पॉइंट्ससह तिसऱ्या स्थानावर आहे. भारताचा रोहित शर्मा 753 पॉइंट्ससह चौथ्या क्रमांकावर आहे. म्हणजेच सध्याच्या टॉप-4 मध्ये भारताच्या तीन फलंदाजांचा समावेश आहे.

भारताचा कुलदीप यादव चार स्थानांनी वर चढून पाचव्या क्रमांकावर पोहोचला आहे. वेस्ट



इंडिजविरुद्धच्या पहिल्या वनडेत पुनरागमन करताना त्याने ४० धावा देत ४ बळी घेतले होते. या कामगिरीसाठी त्याची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली होती. एकदिवसीय गोलंदाजांच्या क्रमवारीत दक्षिण आफ्रिकेचा केशव महाराज तीन स्थानांनी वर चढून तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध त्याने 2/54 आणि 4/20 अशी कामगिरी केली होती.

थोडक्यात पण महत्वाचे



शासनाच्या दडपशाहीविरोधात जनमत जागृत करण्याबाबत

चाकण : दैनिक संध्या

पुणे शहराचा ऐतिहासिक वारसा, ऑक्सिजन हब आणि पर्यावरणाचा एकमेव अमूल्य ठेवा असलेल्या 'एम्प्रेस बोटॅनिकल गार्डन'वर शासनाच्या आडमुठ्या आणि उद्धट धोरणामुळे आज एम्प्रेस गार्डनचे अस्तित्व धोक्यात येण्याची वेळ आली आहे. 'दि ॲग्री-हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया'मार्फत १८९२ सालापासून, म्हणजेच तब्बल १३४ वर्षांपासून या बागेचे आणि येथील शेकडो दुर्मिळ वृक्षांचे जतन अत्यंत निष्ठेने केले जात आहे. मात्र, पुण्याच्या पर्यावरणाचा बळी देऊन न्यायालयाच्या बांधकामासाठी बागेची सुमारे अडीच एकर जागा हडप करण्याचा विघातक घाट शासनाकडून घातला जात आहे. या मनमानी आणि हुकूमशाही निर्णयाचा आम्ही तीव्र निषेध करतो. तसेच समस्त पुणेकर बांधवांनीही शासनाच्या या निर्णयाचा निषेध करून आवाज उठविला पाहिजे. एम्प्रेस गार्डन ही केवळ बाग नसून पुणेकरांसाठी एक निसर्गाचा एक अमूल्य ठेवा आहे. शासकीय दडपशाही आणि बळजोरी: बागेच्या जागेच्या हस्तांतरणाची प्रक्रिया बेकायदेशीरपणे सुरू झाल्यापासून संस्थेने वेळोवेळी आंदोलने केली, निवेदने दिली आणि तीव्र विरोध देखील दर्शवला. परंतु, लोकशाही मूल्यांचा व लोकभावनांचा अनादर करीत शासन केवळ दडपशाहीचा मार्ग अवलंबत आहे. स्वायत्त आणि पर्यावरणवादी संस्थेच्या अधिकारांवर आणि हक्कांवर दरोडा टाकण्याचा हा संतापजनक प्रकार आहे. पुण्याच्या 'फुप्फुसांवर' सिमेंटचा घाव: या विशिष्ट जागेवर भविष्यात 'जैवविविधता पार्क' (Biodiversity Park) विकसित करण्यासाठी संस्थेने शेकडो वृक्ष रोपण करून जपले आहेत. जर हा परिसर सिमेंटच्या जंगलात बदलला, तर येथील संवेदनशील परिसंस्था कायमची नष्ट होईल. आधीच प्रदूषणाने ग्रासलेल्या पुणे शहराचा मध्यवर्ती 'ग्रीन झोन' अशा प्रकारे संपवणे म्हणजे पुणेकरांच्या आरोग्याशी खेळ खेळण्यासारखे आहे. १३४ वर्षांच्या स्वाभिमानी वारशावर आघात: १८९२ पासून आजवर बागेच्या संगोपनासाठी शासनाकडून एक पैसाही आर्थिक मदत मिळालेली नाही. तरीही संस्थेने केवळ लोकसहभाग आणि स्वबळावर हा ऐतिहासिक ठेवा प्राणपणाने जपला. आता जेव्हा हा वारसा फुलतोय, तेव्हा विकासकामांच्या नावाखाली यात विघ्न आणणे अत्यंत दुर्दैवी आहे. पुणेकरांच्या जीवनाचा श्वास असलेल्या या उद्यानाला वाचवण्यासाठी आता गप्प बसणे अशक्य आहे. आपल्या वृत्तपत्राच्या बुलंद आवाजातून या भ्रष्ट आणि विघातक निर्णयाविरोधात रान उठवावे, जेणेकरून शासनाला हा काळा निर्णय मागे घ्यावाच लागेल, ही आग्रहाची विनंती.

बत्ती गुल होत असल्याने नागरिक हैराण

चाकण : दैनिक संध्या

चाकण : चाकण शहर आणि लगतच्या परिसरात अचानक वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. वारंवार बत्ती जाण्याने येथील व्यावसायिक व व्यापाऱ्यांना याचा मोठा फटका बसला आहे. ऐन गर्दीच्या आणि कामाच्या वेळेतच वीज गेल्यामुळे दैनंदिन व्यवहार ठप्प होऊ लागले आहेत. वीज वितरणच्या मुख्य वाहिनीत व फिडरमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाल्याने हा वीजपुरवठा खंडित होत आहे. विजेमुळे मार्केटयार्ड परिसरातील भाजीपाला व्यापारी, किराणा व्यावसायिक आणि इतर दुकानांमधील कामे खोळंबून राहत आहेत. येथील एकतानगर व चाकण भागातील निवासी परिसरातील नागरिकांना, विशेषतः गृहिणी व विद्यार्थ्यांना उकाड्यामुळे मनस्ताप सहन करावा लागत आहे. चाकण परिसरात वारंवार विजेचा लपंडाव सुरू असल्याने व्यापारी व रहिवाशांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. महावितरणने वीज वाहिन्यांची योग्य देखभाल दुरुस्ती करावी, अशी मागणी नगरसेविका रूपाली कांडगे, सुवर्णा राक्षे व अनिल लोहकरे यांनी केली आहे.



कांडगे यांचा वाढदिवस रक्तदान शिबिरामुळे गाजला,

चाकण : दैनिक संध्या

चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक व उद्योजक राहुल दादा कांडगे यांचा वाढदिवस रक्तदान शिबिर, हेल्मेट वाटप आणि रक्तदात्यांना प्रमाणपत्र वाटप करून विशेष उपक्रमांनी चांगलाच गाजला. राहुलदादा कांडगे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून चाकण येथे आर. के. ग्रुपच्या वतीने सामाजिक भान जपत भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा, विशेषतः महिला वर्गाचा अत्यंत उस्फूर्त आणि कौतुकास्पद प्रतिसाद लाभला. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून राबवलेल्या या समाजोपयोगी उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून विशेष कौतुक होत आहे. आजच्या काळात विविध आजार आणि अपघातांमुळे रक्ताची मोठी टंचाई भासते. ही गरज लक्षात घेऊन आणि रुग्णांना वेळेवर मदत मिळावी या उदात्त हेतूने या महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे चाकण नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली ताई कांडगे व उद्योजक राहुल दादा कांडगे यांनी सांगितले. या महारक्तदान शिबिरात परिसरातील तीनशे युवक, नागरिक आणि कार्यकर्त्यांसह महिलांनी मोठ्या संख्येने पुढे येऊन रक्तदान केले. यावेळी तीनशे बाटल्यांचे संकलन करण्यात आले. महिलांचा हा पुढाकार या शिबिराचे मुख्य आकर्षण ठरला. रक्तदानासारख्या पवित्र दानासोबतच रस्ते सुरक्षेचा संदेश देण्यासाठी सर्व रक्तदात्यांना विशेष भेट म्हणून हेलमेट व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आरोग्य सुरक्षेसोबतच वाहनधारकांच्या जिवाच्या सुरक्षेचा विचार करून दिलेली ही भेट उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. रूपालीताई कांडगे यांनी सांगितले की," केवळ औपचारिक शुभेच्छा देण्यापेक्षा अशा प्रकारे रक्तदान शिबिरांसारखे समाजोपयोगी उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करणे ही काळाची गरज आहे. राहुल दादा कांडगे यांनी सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली असून, या उपक्रमातून त्यांनी पुन्हा एकदा समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे." याप्रसंगी डॉ. सायली जाधव, गटनेते नितीन गोरे, नगरसेविका रूपाली कांडगे, प्रीतमभाई परदेशी, योगेश राजापूरकर, अमर इंगळे, मंगेश कांडगे आदी उपस्थित होते.



भारत-इटली भागीदारीतून प्रगत ऑटोमोटिव्ह तंत्रज्ञानाला चालना

अभिजीत डायज आणि इटलीच्या आयएनईव्हीओचा 'अभिनेवो टेक्नॉलॉजीज' संयुक्त उपक्रम; प्रगत मोल्ड्स, टूलिंग आणि उत्पादन तंत्रज्ञानावर भर

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील अभिजीत डायज अँड टूल्स प्रा. लि. आणि इटलीतील आयएनईव्हीओ एस.आर.एल. यांनी 'अभिनेवो टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड' या संयुक्त उपक्रमाला औपचारिक स्वरूप दिले आहे. प्रगत मोल्ड्स, टूलिंग आणि उत्पादन तंत्रज्ञान विकसित करून त्याचे भारतात स्थानिकीकरण करणे, तसेच ऑटोमोबाईल आणि प्लास्टिक प्रक्रिया उद्योगांसाठी अत्याधुनिक उत्पादन उपाय उपलब्ध करून देणे, हा या भागीदारीचा प्रमुख उद्देश आहे.

या उपक्रमात अभिजीतच्या टूलिंग, अभियांत्रिकी आणि प्लास्टिक उत्पादन क्षेत्रातील चार दशकांहून अधिक अनुभवाला आयएनईव्हीओच्या उच्च अचूकतेच्या इंजेक्शन मोल्ड्स, मल्टी-मटेरियल तंत्रज्ञान आणि प्रगत पृष्ठभाग तंत्रज्ञानाची जोड मिळणार आहे. 2K व मल्टी-कॉम्पोनंट मोल्ड्स, इन-मोल्ड डेकोरेशन (आयएमडी), इन-मोल्ड लेबलिंग (आयएमएल), इन-मोल्ड कोटिंग, प्रगत मोल्ड अभियांत्रिकी तसेच प्रक्रिया सिम्युलेशन यांसारख्या तंत्रज्ञानावर सुरुवातीला भर दिला जाणार आहे.

अभिजीत डायज अँड टूल्सचे संचालक अभिजीत राऊत म्हणाले, "प्रगत तंत्रज्ञान संकल्पनेपासून औद्योगिकीकरणापर्यंत नेणे, हे या भागीदारीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ग्राहकांना जलद विकास, जवळचे अभियांत्रिकी सहकार्य आणि जागतिक दर्जाच्या गुणवत्तेसह अत्याधुनिक टूलिंग उपाय उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे."

अभिजीत समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जयामुरुगन थंगावेल म्हणाले, "आयएनईव्हीओच्या विशेष युरोपीय तंत्रज्ञानाची अभिजीतच्या अभियांत्रिकी आणि उत्पादन क्षमतेशी सांगड घालून भारतात प्रगत उत्पादन क्षमता विकसित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यामुळे भारतीय तसेच जागतिक ग्राहकांसाठी सक्षम व्यासपीठ निर्माण होईल."

आयएनईव्हीओचे व्यवस्थापकीय संचालक – विक्री रॉबर्टो फगाराझी यांनी भारतातील वाढत्या ऑटोमोटिव्ह उत्पादन क्षेत्राच्या पार्श्वभूमीवर स्थानिकीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. "तंत्रज्ञान आणि गुणवत्तेशी तडजोड न करता प्रगत मोल्ड्स आणि उत्पादन तंत्रज्ञान भारताच्या जवळ आणण्याची ही महत्त्वाची संधी आहे," असे त्यांनी सांगितले. या भारत-इटली भागीदारीच्या प्रक्रियेत क्रिसेंडो वर्ल्डवाईडने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. २०२५च्या सुरुवातीपासून क्रिसेंडोने अभिजीतसोबत काम करत संभाव्य आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान भागीदारांची ओळख, संपर्क, बैठका आणि व्यावसायिक संवाद यांचा समन्वय साधला. या प्रयत्नांतून जून २०२५ मध्ये अभिजीत डायज आणि आयएनईव्हीओ यांच्यातील सामंजस्य करारासाठीही क्रिसेंडोने महत्त्वाची भूमिका बजावली. त्यानंतर ही भागीदारी पुढे जात सप्टेंबर २०२६ मध्ये 'अभिनेवो टेक्नॉलॉजीज' या संयुक्त उपक्रमाच्या स्थापनेपर्यंत पोहोचली.

क्रिसेंडो वर्ल्डवाईडच्या संचालक जल्पा जाधव आणि वरिष्ठ व्यवस्थापक मकरंद कोळेकर यांच्यासह संस्थेचे प्रतिनिधी या प्रसंगी उपस्थित होते. आयएनईव्हीओचे मुख्य कार्यकारी अधिकारी लुईगी कव्हर, रॉबर्टो फगाराझी, आयएनईव्हीओ जीएमबीएचचे व्यवस्थापकीय संचालक अँड्रियास पॉप, तसेच अभिजीत डायजचे संचालक निखिल राऊत आणि अभिजीत राऊत यांचीही उपस्थिती होती. इटालियन ट्रेड एजन्सीच्या नवी दिल्ली कार्यालयातील पालक सहानी यांनी ऑनलाइन माध्यमातून सहभाग घेतला.

अभिजीत डायजचे संचालक निखिल राऊत म्हणाले, "ही केवळ व्यावसायिक भागीदारी नसून दोन कंपन्यांच्या क्षमता, अनुभव आणि संस्कृती एकत्र आणणारे दीर्घकालीन सहकार्य आहे. ग्राहकांना मूल्य देणे आणि विश्वास निर्माण करणे, हे 'अभिनेवो'च्या यशाचे महत्त्वाचे मापदंड असतील." या संयुक्त उपक्रमातून भारतासह आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी प्रगत टूलिंग, मोल्ड्स आणि उत्पादन तंत्रज्ञानविषयक उपाय विकसित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

राजे नागरी सहकारी पतसंस्था सामाजिक उपक्रमात अग्रेसर

■ नारायणगाव (दै. संध्या)



राजे नागरी सहकारी पतसंस्थेची तिसरी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साही वातावरणात संपन्न झाली. या संस्थेला सण 2025 - 26 या आर्थिक वर्षात ऑडिट वर्ग ब प्राप्त झालेला असून पुढच्या आर्थिक वर्षात संस्था नक्की नफ्यात जाईल आणि ऑडिट वर्ग अ मिळेल असा विश्वास उपस्थित सर्व हितचिंतकांनी व्यक्त केला.

सिल्वर पार्क, वारूळवाडी येथील सभागृहात या संस्थेची तिसरी सर्वसाधारण सभा पार पडली. विषय पत्रिकेवरील 1 ते 12 विषयांवर खेळीमेळीच्या वातावरणात सर्व संचालक आणि सभासदांमध्ये चर्चा झाली. जुन्नर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते सुरज वाजगे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. नारायणगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी उपस्थित सर्व सभासद आणि संचालकांना मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकरवाडी येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेच्या वतीने शालेय साहित्य देऊन करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणामध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जुबेर शेख यांनी राजे नागरी सहकारी संस्थेने आतापर्यंत केलेल्या वेगवेगळ्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उपक्रमाबाबत उपस्थितांना माहिती दिली. राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य आणि राजे नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये संचालक असलेले सर्व सभासद हे तरुण असून या सर्व तरुणांनी एकत्र येऊन सामाजिक कार्य करण्यासाठी राजे नागरी संस्थेच्या नावाने उत्तम योगदान दिलेले आहे. संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक आदरणीय हरिश्चंद्र नरसुडे यांनी संस्थेबद्दल आपले विचार व्यक्त केले आणि थोड्याच दिवसात संस्था नावारूपाला येईल असे सांगितले. सभासद मनोहर वायकर यांनी संस्था करीत असलेल्या शैक्षणिक उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले व असेच उपक्रम सातत्याने राजे नागरी पतसंस्थेमार्फत राबवावेत, अशा प्रकारचा मोलाचा सल्ला दिला.या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपाध्यक्ष योगेश गायकवाड, सचिव जितेंद्र अडसरे, संचालक विशाल गोरडे, पंकज भालेराव, सुशील सोनवणे, सकलेन आतार, विक्रांत मेहेर, संजय वारुळे, संचालिका सीमा औटी, शैला वाव्हळ, कायदेविषयक सल्लागार ॲड. आसिफ सय्यद, सल्लागार मुबारक मुजावर, अभिषेक भुजबळ, जावेद पटेल, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियांका रासकर, क्लार्क प्रांजल राजगुरू, मुख्य वसुली अधिकारी स्वप्निल भुजबळ, दैनंदिन ठेव प्रतिनिधी वैशाली भुजबळ, वैशाली महाले आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी वारुळवाडीचे माजी उपसरपंच प्रकाश भालेकर सामाजिक कार्यकर्ते योगेश तोडकरी, नितीन भालेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्येष्ठ मार्गदर्शक अस्लम शेख, रामदास वारुळे, सामाजिक कार्यकर्ते गौतम औटी, वारूळवाडीच्या माजी उपसरपंच ज्योती संते, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या थोरात मॅडम, पत्रकार अशफाक पटेल, किशोर वारुळे उपस्थित होते. मार्गदर्शक जावेद शेख , भाग्यश्री ताजणे व सर्पमित्र नागेश्वरी आवर्जून उपस्थित होत्या. या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रास्ताविक नवनाथ पोकळे यांनी केले.

डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी चाकणला धूर फवारणी

■ चाकण (दै. संध्या)



बदलत्या वातावरणामुळे व पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वाढणाऱ्या डासांच्या प्रादुर्भावाला आळा घालण्यासाठी आणि नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून आरोग्यदायी उपक्रम राबवण्यात आला. डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी धूर फवारणी करण्यात आली.

चाकण नगरपरिषदेच्या सहकार्याने महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे यांनी स्वतः पुढाकार घेऊन चाकण मार्केटयार्ड ते एकतानगर या संपूर्ण परिसरात मच्छर फवारणी व धूर धुरळणी आणि फॉगिंग मोहीम राबविली. गेल्या काही दिवसांपासून चाकण शहरातील काही भागांत डासांचे प्रमाण वाढल्याने डेंग्यू, मलेरिया व चिकुनगुनिया यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाला होता. ही गंभीर बाब लक्षात घेऊन नगरसेविका रुपाली कांडगे यांनी स्वतः पुढाकार घेत चाकण नगरपरिषदेच्या आरोग्य विभागामार्फत मार्केटयार्ड ते एकतानगर या दरम्यानच्या सर्व गल्ल्या, मुख्य रस्ते, नाल्यांचे परिसर आणि मोकळ्या जागांवर कीटकनाशक फवारणी करून घेतली. रुपाली कांडगे यांनी यावेळी सांगितले की," चाकण मधील नागरिकांचे आरोग्य आणि स्वच्छता जपणे ही आपली पहिली प्राथमिकता आहे. डासांमुळे होणाऱ्या आजारांपासून नागरिकांचा बचाव व्हावा यासाठी ही फवारणी करण्यात आली. यापुढेही गरजेनुसार इतर भागांत स्वच्छता व आरोग्यविषयक उपक्रम सातत्याने राबवले जातील." या फवारणी मोहीम उपक्रमामुळे परिसरातील डासांचा उपद्रव कमी होण्यास मदत होणार असल्याने मार्केटयार्ड व एकतानगर परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

महिला उपसरपंचाने कष्टातून पिकविले उच्च प्रतीचे डाळिंब

■ कोरेगावमुळ(दै. संध्या)

शेतीमध्ये सातत्याने नवनवीन प्रयोग करत कमी खर्चात दर्जेदार उत्पादन घेण्याचे अनेक शेतकरी प्रयत्न करत असतात. हवेली तालुक्यातील भवरापूर येथील उपसरपंच शंकुतला सुरेश टिळेकर यांनीही अशाच पद्धतीने अत्यंत किचकट व खर्चिक समजल्या जाणाऱ्या डाळिंब पिकाचे स्वतः नियोजन करून इतरांच्या तुलनेत कमी खर्चात उच्च प्रतीचे डाळिंब उत्पादन घेतले आहे.

गावच्या उपसरपंचपदाची जबाबदारी सांभाळत असतानाही शंकुतला टिळेकर या शेतीकडे दुर्लक्ष करत नाहीत. त्या आपले पती सुरेश बाप्पू टिळेकर यांच्या खांद्याला खांदा लावून शेतात राबतात. तसेच त्यांच्या सुनबाईंचीही शेतीच्या कामात त्यांना मोलाची साथ मिळते.

कुटुंबातील सर्वजण एकत्रितपणे नियोजनबद्ध पद्धतीने शेती करत असल्याने डाळिंब पिकातून चांगले उत्पादन घेण्यात त्यांना यश आले आहे. रस्त्याने ये-जा करणारे नागरिक अनेकदा त्यांना शेतात काम करताना पाहून विचारतात, 'तुम्ही गावच्या उपसरपंच असूनही एवढे काम स्वतः कसे करता?' त्यावर शंकुतला टिळेकर यांचे उत्तर मनाला भावणारे आहे. त्या म्हणतात, 'पदं येत असतात आणि जात असतात; मात्र ज्या काळ्या आईने आपल्या अनेक पिढ्यांना जगवले आहे आणि पुढेही जगवणार आहे, तिची सेवा करण्यात कसला आला कमीपणा? आपण प्रामाणिकपणे कष्ट करत राहिलो, तर ही काळी आई आपल्याला कधीही उपाशी ठेवणार नाही'. त्यांच्या या विचारातून शेतीबद्दलची निष्ठा, कष्टाची तयारी आणि मातीतून जगण्याचा आत्मविश्वास दिसून येतो. लोकप्रतिनिधी म्हणून गावाची जबाबदारी सांभाळतानाच स्वतः शेतीत राबणाऱ्या शंकुतला टिळेकर यांचा आदर्श ग्रामीण भागातील महिलांसह इतर शेतकऱ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.



RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.


राजकारणापलीकडचा काश्मीर जगासमोर

डॉ. वैदेही तामन यांच्या पाच ग्रंथांतून आध्यात्मिक वारशाचा वेध

■ पुणे (दै. संध्या)

काश्मीरचा उल्लेख प्रामुख्याने राजकारण, सुरक्षा आणि समकालीन घडामोडींच्या संदर्भात होत असला, तरी या भूमीचा समृद्ध आध्यात्मिक, साहित्यिक आणि बौद्धिक वारसा तितकाच महत्त्वाचा आहे. याच वारशाचा संशोधनातून वेध घेत महाराष्ट्रातील पत्रकार, लेखिका आणि संशोधक डॉ. वैदेही तामन यांनी काश्मीरच्या सांस्कृतिक इतिहासावर पाच विशेष ग्रंथ लिहिले आहेत. त्यांच्या या संशोधनामुळे लाल डेड, आचार्य अभिनवगुप्त आणि काश्मीरच्या प्राचीन परंपरांकडे नव्याने लक्ष वेधले गेले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून डॉ. तामन यांनी काश्मीर खोऱ्यात प्रवास करून तेथील इतिहास, साहित्य, तत्त्वज्ञान, परंपरा आणि आध्यात्मिक वारशाचा अभ्यास केला. मुख्य प्रवाहातील चर्चेत तुलनेने कमी अधोरेखित होणाऱ्या या पैलूंना त्यांनी आपल्या लेखनातून व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या ग्रंथांमध्ये "लाल डेड काश्मीरची माता", "अभिनवगुप्त – शाश्वत शिवाचा आवाज" तसेच नीलमत पुराणावरील संशोधनाचा समावेश आहे. या ग्रंथांच्या माध्यमातून काश्मीरच्या प्राचीन परंपरा, तत्त्वज्ञान, पवित्र भूगोल आणि आध्यात्मिक इतिहासाचा मागोवा घेण्यात आला आहे.



काश्मीरच्या संत-कवयित्री लाल डेड यांच्या जीवनकार्यावर आधारित डॉ. तामन यांचे लेखन विशेष उल्लेखनीय ठरले आहे. त्याचबरोबर आचार्य अभिनवगुप्त यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या त्यांच्या ग्रंथातून काश्मीर शैव परंपरेतील समृद्ध विचारविश्व समोर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. डॉ. तामन यांच्या मते, काश्मीरकडे केवळ वर्तमानातील घटनांच्या चौकटीतून पाहता कामा नये. काश्मीरचा प्राचीन आध्यात्मिक आणि सांस्कृतिक इतिहास पुढील पिढ्यांसाठी जतन होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने संशोधन आणि ग्रंथलेखनाच्या माध्यमातून हा वारसा दस्तावेजबद्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. श्रीनगर येथे आयोजित लाल डेड साहित्य पुरस्कार सोहळ्यात, जम्मू-काश्मीरचे लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांच्या उपस्थितीत डॉ. वैदेही तामन यांच्या लाल डेड काश्मीरची माता या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

गुलशन बुक्स, काश्मीर यांनी प्रकाशित केलेल्या त्यांच्या ग्रंथांमुळे काश्मीरच्या साहित्यिक, तात्त्विक आणि आध्यात्मिक वारशावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. डिजिटल युगात माहिती वेगाने प्रसारित होत असताना ती तितक्याच वेगाने विस्मृतीत जाण्याची शक्यताही असते. अशा काळात संशोधन, दस्तावेजीकरण आणि ग्रंथलेखनाच्या माध्यमातून सांस्कृतिक स्मृती जतन करण्याचा मार्ग डॉ. वैदेही तामन यांनी स्वीकारला आहे. त्यांच्या पाच ग्रंथांमधून काश्मीरच्या प्राचीन सांस्कृतिक आणि वैचारिक वारशाचा अभ्यास करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण साहित्यिक स्रोत उपलब्ध झाला आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



आरपीआय खिश्चन आघाडीच्या वतीने पुणे लष्कर पोलीस ठाण्यामध्ये निवेदन

पुणे : दैनिक संध्या

दिनांक 18/09/2026 रोजी माळी घोगरगाव, तालुका वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे हिंदू आक्रोश मोर्चा सभेदरम्यान सरला बेटाचे महंत रामगिरी महाराज आणि विवेकानंद महाराज यांनी आणि इतर वक्तांनी खिश्चन समाजाविरुद्ध प्रक्षोभित भाषण करणे हिंदू आणि खिश्चन समाजांमध्ये धर्माच्या आधारावर शत्रुत्व निर्माण करण्याचा आणि खिश्चन समाजाच्या धार्मिक भावना दुखावण्याच्या उद्देशाने वक्तांनी अपशब्द वापरून आक्षेपहार्य भाषण केल्या केल्याबद्दल अशांवर एफआयआर (FiR) दाखल करण्यात यावा यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पुणे शहर खिश्चन आघाडीच्या वतीने पुणे लष्कर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज हांडे यांना या संदर्भाचे निवेदन देण्यात आले त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी कारवाई नाही झाल्यास लष्कर पोलीस ठाण्याच्या समोर आरपीआयच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा पुणे शहराध्यक्ष क्रिस्तफर राजमनी यांनी दिला यावेळी आरपीआय पुणे शहर उपाध्यक्ष येसू दोरोस्वामी, पुणे शहर जनरल सेक्रेटरी अरुण पवार, उपाध्यक्ष एस डी पिल्ले, अल्विस पाटोळे, आरपीआय खिश्चन आघाडी युवक अध्यक्ष, डॉर्थी थॉमस, जॅसलीन पिल्ले, राजश्री मुदलियार, अंजली पिल्ले, फिलिप फ्रान्सिस, आदी उपस्थित होते.

२४ वे पुणे बुक फेअर ७ ऑक्टोबर पासून

पुणे : दैनिक संध्या

"ज्ञानसमृद्ध समाजाची निर्मिती" या संकल्पनेवर आधारित "पुणे बुक फेअर २०२६अर्थात "पुणे पुस्तक जत्रा"हे २४ वे प्रदर्शन गुरुवार ७ ऑक्टोबर ते रविवार ११ ऑक्टोबर २०२६ दरम्यान न्यू इंग्लिश स्कूल मैदान,टिळक रोड,पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे. गुरुवार ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता खासदार माननीय छत्रपती उदयनराजे भोसले,हे पुणे बुक फेअरचे उद्घाटन करणार आहेत. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन माननीय प्रमोद रावत हे कार्यक्रमाचे अध्यक्ष,डीइएस चे उपाध्यक्ष अशोक पलांडे, शिक्षण आयुक्त (महाराष्ट्र)सचिंद्र प्रताप सिंह , महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री योगेश सोमण हे प्रमुख पाहुणे तर नामवंत साहित्यिक श्री रवींद्र गुर्जर,इंद्रजीत बागल सहाय्यक संचालक प्रसार भारती,सुर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टीट्युटचे संस्थापक व अध्यक्ष प्रा.संजय चोरडीया,आणि डीइएसचे कार्यवाह डॉ आनंद काटीकर हे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा वार्षिक आणि शैक्षणिक पुस्तक मेळावा, महाराष्ट्र साहित्य परिषद,आणि लोकमंगल समूह शिक्षणस्था यांच्या सहकार्याने आयोजित केला आहे.

मुख्य मानव संसाधन अधिकारीपदी डिंपल कलोया यांची नियुक्ती

पुणे : दैनिक संध्या



जगातील आघाडीच्या वित्तीय सेवा कंपन्यांपैकी एक असलेल्या मेटलाइफने मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर च्या मुख्य मानव संसाधन अधिकारी पदावर डिंपल कलोया यांची नियुक्ती जाहीर केली आहे. या भूमिकेत डिंपल मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर च्या कर्मचारी धोरणाचे नेतृत्व करतील. मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर जागतिक स्तरावर मेटलाइफचा एक धोरणात्मक भागीदार म्हणून सातत्याने विकसित होत असताना, प्रतिभा विकास, संस्थात्मक क्षमता आणि कर्मचारी अनुभव अधिक मजबूत करण्यावर त्यांचा विशेष भर असेल. "मेटलाइफमध्ये डिंपल यांचे स्वागत करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. कर्मचारी धोरणांची जडणघडण आणि संस्थात्मक परिवर्तनाचे नेतृत्व करण्यातील त्यांचा व्यापक अनुभव, मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर ला भविष्यासाठी सक्षम क्षमता विकसित करताना आणि मेटलाइफला जागतिक स्तरावर धोरणात्मक मूल्य प्रदान करण्यातील आपली भूमिका अधिक बळकट करताना निश्चितच मोलाचा ठरेल. आमच्या कर्मचारी-केंद्रित धोरणांच्या पुढील टप्प्याला आकार देण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाची आम्ही उत्सुकतेने वाट पाहत आहोत," असे मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर चे मॅनेजिंग डायरेक्टर आशिष के. श्रीवास्तव यांनी सांगितले. डिंपल यांना मानव संसाधन व्यवस्थापन आणि संस्थात्मक परिवर्तन क्षेत्रातील 25 वर्षांहून अधिक अनुभव आहे. प्रतिभा धोरण, मनुष्यबळ नियोजन, संस्थात्मक रचना, नेतृत्व विकास आणि कर्मचारी अनुभव या क्षेत्रांतील त्यांचे सखोल कौशल्य आहे. त्या एचएसबीसी मधून मेटलाइफमध्ये दाखल होत असून, तेथे त्यांनी मानव संसाधन विभागातील विविध वरिष्ठ नेतृत्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. सर्वात अलीकडे त्या ग्लोबल कॅपेबिलिटी नेटवर्क आणि एचएसबीसी टेक्नॉलजी सेंटर्सच्या मानव संसाधन विभागाच्या प्रमुख म्हणून कार्यरत होत्या. डिंपल यांनी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट टेक्नॉलजी, गाझियाबाद येथून बिझनेस मॅनेजमेंटमध्ये पदव्युत्तर डिप्लोमा प्राप्त केला आहे. तसेच त्यांनी अण्णामलाई विद्यापीठातून मानव संसाधन व्यवस्थापन विषयात पदव्युत्तर पदवी मिळवली आहे. याशिवाय, त्यांनी युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्व्हेनियाच्या द व्हार्टन स्कूलअंतर्गत अरेस्टी इन्स्टिट्यूट ऑफ एक्झिक्युटिव्ह एज्युकेशनचा मुख्य मानव संसाधन अधिकारी कार्यक्रम पूर्ण केला आहे.

मोशीत ४ ऑक्टोबरला पुन्हा घुमणार हजारो ढोल-ताशांचा निनाद..!

पुणे : दैनिक संध्या


धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पुतळा "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण" ला ऐतिहासिक मानवंदना देण्याकरिता गतवर्षी मोशीत ढोल-ताशांचा विश्वविक्रमी निवाद करण्यात आला. यावर्षी पुन्हा एकदा या गगनभेदी सोहळ्याने शिव-शंभू विचारांचा गजर होणार आहे. "रणवाद्य" म्हणून हिंदवी स्वराज्याच्या इतिहासाची साक्ष असलेले ढोल-ताशा पथके यासाठी महाराष्ट्रभरातून पिंपरी-चिंचवडमध्ये दाखल होणार आहेत. रविवार, ४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता बो-हाडेवाडी, मोशी येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रात हा सोहळा होणार आहे. आयोजित पत्रकार परिषदेत आयोजकांनी ही माहिती दिली. हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड आणि ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम होणार आहे. यंदा पाच हजारांहून अधिक ढोलवादकांची नोंदणी पूर्ण झाल्याचे आयोजकांनी पत्रकार परिषदेत सांगितले. विविध पथकांच्या सामूहिक वादनातून विश्वविक्रम नोंदवण्याचा त्यांचा संकल्प आहे. विक्रमाची अधिकृत पुष्टी कार्यक्रमानंतर होईल.तसेच, पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्यात येत असलेल्या १२८ मीटर उंच भगव्या ध्वजासही या सोहळ्यात मानवंदना देण्यात येणार आहे. हा जगातील सर्वांत उंच भगवा ध्वज म्हणून ओळखला जाणार आहे.

विस्डम इन मोशन फोरमच्या संकेत स्थळाचे सामाजिक न्याय मंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

■ पुणे (दै. संध्या)

विस्डम इन मोशन फोरम आणि कॅटलिस्ट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषद- पुणे २०२६' या कार्यक्रमाचे आयोजन १७ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. या परिषदेबाबत माहिती देणाऱ्या www.thewisdominmotion.org या अधिकृत संकेतस्थळाचे लोकार्पण राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते करण्यात आले.

बौद्ध महिला परिषदेच्या आयोजन समितीच्या डॉ. उज्ज्वला आंदुरकर (प्रसिद्ध भूलतज्ज्ञ), डॉ. संध्या हरिभक्त (बालरोगतज्ज्ञ), डॉ. वैशाली भामरे तसेच लक्ष्मीकांता माने (पाली व बौद्ध अध्ययनाच्या अभ्यासक) यांनी याबाबत माहिती दिली.



विविध देशातील सहभागी वक्ते, नोंदणी प्रक्रिया, परिषद आयोजित करण्यापाठीमागे उद्देश याबाबतची माहिती या संकेत स्थळावर देण्यात आली आहे. व्हिएतनाम, श्रीलंका, कोरिया, ऑस्ट्रेलिया आणि भारतातील नामांकित भिक्खुनी तसेच विविध क्षेत्रांतील गाढे अभ्यासक या परिषदेत वक्ते आणि चर्चासत्रातील सदस्य म्हणून सहभागी होणार आहेत.

बौद्ध धम्माचा तसेच भगवान बुद्धांच्या विचारांचा जागतिक स्तरावर प्रचार- प्रसार, तसेच विविध देशांतील बौद्ध अभ्यासक, भिक्खू, संशोधक आणि अनुयायांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय बौद्ध परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे. भारत आणि परदेशातील बौद्ध भिक्खू-भिक्खूणी, अभ्यासक, शिक्षणतज्ज्ञ, व्यावसायिक, कलाकार, सामाजिक नेते आणि धम्म-साधक एका व्यासपीठावर एकत्र येणार आहेत.

आंतरराष्ट्रीय 'फॉरगेट अँड फॉरगिव्ह डे'साजरा करण्याची मागणी

■ पुणे(दै. संध्या)

जैन धर्मातील क्षमापना, 'मिच्छामि दुक्कडम्' आणि संवत्सरी या परंपरांमधून दिला जाणारा क्षमा, अहिंसा, मैत्री आणि शांततेचा संदेश जागतिक स्तरावर पोहोचविण्याच्या दिशेने एक प्रस्ताव पुढे आला आहे. शाकाहार आणि अहिंसेच्या प्रचारप्रसारासाठी कार्यरत असलेले डॉ. कल्याण गंगवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्र्यांना पत्र पाठवून दरवर्षी सप्टेंबर महिन्याच्या चौथ्या रविवारी 'फॉरगेट अँड फॉरगिव्ह डे (Forget & Forgive Day)' अर्थात 'विसरा आणि माफ करा दिवस' साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला आहे.



जगभरात हिंसाचार, दहशतवाद, भीती, द्वेष, युद्धे आणि विविध संघर्षांसोबतच जागतिक तापमानवाढ आणि हवामानातील बदल यांसारख्या गंभीर समस्यांचा सामना सुरू आहे. अशा परिस्थितीत भूतकाळातील कटुता आणि वैमनस्य विसरणे, परस्परांची क्षमा मागणे, एकमेकांना क्षमा करणे तसेच मतभेदांवर संवाद आणि सलोख्याच्या माध्यमातून मार्ग काढणे, या मूल्यांना समर्पित दिवस असावा, अशी संकल्पना या प्रस्तावातून मांडण्यात आली आहे. जैन धर्मातील पर्युषण महापर्वाच्या सांगतेला साजऱ्या होणाऱ्या संवत्सरीच्या निमित्ताने क्षमापना केली जाते. या दिवशी व्यक्ती वर्षभरातील आपल्या विचार, वाणी आणि कृतींचे आत्मपरीक्षण करते. जाणून अजाणतेपणी कोणाला दुखावले असल्यास त्याची क्षमा मागण्याबरोबरच इतरांनी केलेल्या चुका मनातून सोडून देत त्यांना क्षमा करण्याची भावना व्यक्त केली.

अपरिचित गोवा दर्शनासाठी सुख समृद्ध लाईफस्टाईल फाउंडेशचे अभियान

■ पुणे(दै. संध्या)

पुणे : गोवा म्हटले की समुद्रकिनारे, निळाशार समुद्र, पर्यटन आणि नाईटलाइफ अशी सर्वसाधारण ओळख आहे. मात्र या परिचित गोव्यापलीकडे इतिहास, अध्यात्म, संस्कृती, परंपरा आणि निसर्गाने समृद्ध असा एक वेगळा गोवा आहे. गोवा केवळ पाहण्यापेक्षा त्याचा इतिहास, संस्कृती आणि आध्यात्मिक वारसा समजून घेण्याचा अनुभव पर्यटकांना मिळावा, या उद्देशाने गोव्यातील 'सुख समृद्ध लाईफस्टाईल फाऊंडेशन'च्या वतीने 'अपरिचित गोवा दर्शन' या विशेष पर्यटन उपक्रमाचे आयोजन केले असल्याची माहिती संस्थेचे संचालक राजेंद्र किर्लोस्कर यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

किर्लोस्कर म्हणाले मोबाईलच्या माध्यमातून पर्यटनस्थळांची माहिती घेण्याऐवजी प्रत्यक्ष स्थळांना भेट देऊन त्यांचा इतिहास, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व जाणून घेता यावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. प्राचीन मंदिरे, किल्ले, ऐतिहासिक स्थळे, स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती तसेच गोमंतकीय संस्कृती आणि स्थानिक जीवनपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव पर्यटकांना या माध्यमातून घेता येणार आहे.छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या गोव्यातील इतिहासाशी संबंधित स्थळे, प्राचीन किल्ले, मंदिरे व देवस्थानांना भेट देण्याबरोबरच गोव्याच्या ऐतिहासिक वारशाची माहिती करून देण्यात येणार आहे.देवभक्तांसाठी मंदिरदर्शन, तरुणांसाठी इतिहास आणि निसर्गाची अनुभूती, कुटुंबांसाठी सांस्कृतिक पर्यटन, तर ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्या सोयीनुसार नियोजन, अशी या उपक्रमाची वैशिष्ट्ये आहेत.

सुप्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत 'पाच फुटाचा बच्चन' चित्रपटाचा ट्रेलर लाँच

■ पुणे(दै. संध्या)

कीर्तनातून प्रसिद्धीस आलेल्या एका तरुणीची गोष्ट सांगणाऱ्या 'पाच फुटाचा बच्चन' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच सुप्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या दिमाखात लाँच करण्यात आला. चित्रपटाच्या टीजरला भरभरून मिळालेल्या प्रतिसादानंतर आता ट्रेलरमुळे चित्रपटाविषयी आणखी उत्सुकता निर्माण झाली असून, हा चित्रपट ९ ऑक्टोबरला रुपेरी पडद्यावर झळकण्यास सज्ज झाला आहे.

'पाच फुटाचा बच्चन' या चित्रपटात तरूण कीर्तनकार मुलीची गोष्ट आहे. तिच्या कीर्तनात कोल्हापुरी भाषा आहे. संतांचे अभंग तिला मुखोद्गत आहेत. जनमानसात तिचं प्रचंड नाव आहे. उंचीने पाच फूट असलेल्या या तडफदार मुलीला 'पाच फुटाचा बच्चन' म्हणून ओळखलं जातं. या प्रमुख भूमिकेतून श्रुती मधुदीप



ही अभिनेत्री पदार्पण करत आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या ट्रेलरने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. यात तगड्या कलाकारांची फौज आहे. मराठी मनाला भावणाऱ्या कीर्तन या विषयाला हा सिनेमा साद घालतो आहे, असं दिसतं आहे. अवघ्या अडीच मिनिटाचा हा ट्रेलर अत्यंत नाट्यमय असून त्यातील दृश्यांनी प्रेक्षकांची मने खिळवून ठेवली आहेत. या चित्रपटात नेमकं काय घडणार आहे, याची उत्सुकता आता शिगेला पोचली आहे. मूळ प्रायोगिक एकपात्री नाटकातून मांडण्यात आलेल्या या गोष्टीला प्रेक्षकांचा तूफान प्रतिसाद मिळाला होता. मराठी मनाची नस पकडेल अशा या नाटकाचे चित्रपटात रूपांतर झाले आहे. नाटकातून चित्रपटात रूपांतर होण्याच्या या दैदीप्यमान यादीत या चित्रपटाचे नाव जोडले गेल्याने या चित्रपटाविषयीचं कुतूहल वाढलं आहे. अभिनेते रितेश म्हणाले, बच्चनच्या बाजूला उभे राहणं मग ते सहा फुटाचा असो किंवा पाच फुटाचा मला ही थोडी धाकधूक होती.

प्रा. डॉ. मंगेश कराड 'मराठवाडा रत्न' पुरस्काराने सन्मानित

■ पुणे(दै. संध्या)

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी एडीटी) विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांना 'मराठवाडा रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मराठवाडा जनविकास परिषद, ठाणे यांच्या वतीने आयोजित मराठवाडा मुक्तिसंग्राम सोहळ्यात राम गणेश गडकरी रंगायतन, तलावपाळी येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा झाला. मराठवाडा जनविकास परिषदेचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे आणि वरिष्ठ उपाध्यक्ष नितीन कदम यांनी प्रा. डॉ. कराड यांचा गौरव केला. मराठवाडा जनविकास परिषद गेल्या १७ वर्षांपासून मराठवाड्यातील नागरिकांच्या



सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेच्या वतीने दरवर्षी मराठवाडा बहुभाषिक दिन सोहळ्याचे आयोजन केले जाते. यंदा शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेत प्रा. डॉ. कराड यांची 'मराठवाडा रत्न' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. पुरस्काराबद्दल बोलताना प्रा. डॉ. मंगेश कराड यांनी सांगितले की, मराठवाडा ही केवळ भौगोलिक भूमी नसून त्याग, पराक्रम, अध्यात्म आणि संघर्षाचा ज्वलंत इतिहास असलेली भूमी आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि राजकीय जडणघडणीत मराठवाड्याचे योगदान अतुलनीय आहे. मराठवाड्याचा पुत्र म्हणून 'मराठवाडा रत्न' हा सन्मान मिळणे ही अभिमानाची बाब आहे.

माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शनाच्या बळावर एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्याला मिळालेली ही पुरस्काररूपी पावती आहे, असेही त्यांनी म्हटले. शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल मिळालेला हा पुरस्कार केवळ वैयक्तिक सन्मान नसून कराड कुटुंबीय तसेच एमआयटी एडीटी विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव असल्याची भावना प्रा. डॉ. कराड यांनी यावेळी व्यक्त केली.

थोडक्यात पण महत्वाचे



श्री छत्रपती शिवाजी विद्यालय येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती उत्साहात संपन्न

मुर्टी : दैनिक संध्या

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९ वी जयंती नुकतीच संपन्न झाली. रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय मुर्टी येथे कर्मवीरांच्या प्रतिमेची मिरवणुक काढण्यात आली होती.या मिरवणुकी मध्ये लेझीम, झांज पथक, श्री छत्रपती शिवाजी महाराज गीत व गणपती गीत असे विविध सांस्कृतिक कार्यक्रमात संपन्न झाले.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंती निमित्त दहावी परिक्षांत पहीले तीन आलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. कर्मवीर शैक्षणिक मंच (माजी विद्यार्थी) यांच्याकडून गरीब विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य तसेच शाळेसाठी तांब्याची घंटा देण्यात आली. कर्मवीर माजी विद्यार्थी संघटनेतर्फे 20 विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी आर.व्ही.जगदाळे -रयत शिक्षण संस्था सातारा जनरल बॉडी सदस्य, अशोक जगदाळे- रयत शिक्षण संस्था सातारा जनरल बॉडी सदस्य, लालासाहेब नलवडे -रयत शिक्षण संस्था जनरल बॉडी सदस्य,दत्तात्रय गायकवाड - सहा.विभागीय अधिकारी पश्चिम विभाग,विकास जाधव उपशिक्षक -आर एन अग्रवाल टेक्निकल हायस्कूल बारामती, नानासो जगदाळे-स्थानिक स्कुल कमिटी सदस्य, छबन राजपुरे, माजी मुख्याध्यापक साळुंके जी.ई, मुख्यद्यापक रामदास बांदल सर व इतर मान्यवर, पालक वर्ग शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लडकत सर यांनी केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास बांदल यांनी केले तर आभार प्रदर्शन कुंभार सर यांनी केले.



पिंपरी-चिंचवडच्या प्रिथिका प्रदीपची ऐतिहासिक कामगिरी

पिंपरी : दैनिक संध्या

एची-नागोया एशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला कंपाऊंड धनुर्विद्या संघाने दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. अंतिम सामन्यात भारताने बलाढ्य चीन संघाचा 238-234 अशा गुणांनी पराभव करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. या ऐतिहासिक विजयात पिंपरी-चिंचवडची कन्या प्रिथिका प्रदीप हिने महत्त्वपूर्ण योगदान देत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. भारतीय महिला संघात प्रिथिका प्रदीप, ज्योती सुरेखा वेन्नम आणि चिकिता तनीपार्थी यांचा समावेश होता. अंतिम सामन्यात भारतीय संघाने सुरुवातीपासूनच अचूक निशाणेबाजीचे प्रदर्शन करत चीनवर वर्चस्व राखले. भारताचा 238 गुणांचा अंतिम स्कोअर हा दक्षिण कोरियाने 2014 मध्ये नोंदवलेल्या जागतिक विक्रमाशी बरोबरी करणारा ठरला. उपांत्य फेरीत भारताने दक्षिण कोरियाचा 234-233 अशा अत्यंत चुरशीच्या लढतीत पराभव करून अंतिम फेरी गाठली होती. त्यानंतर अंतिम सामन्यातही भारतीय महिला तिरंदाजांनी संयम आणि कौशल्याचे दर्शन घडवत सुवर्णपदकावर मोहोर उमटवली. विशेष म्हणजे, भारतीय महिला कंपाऊंड संघाने एशियाई क्रीडा स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी केली आहे. ज्योती सुरेखा वेन्नम यांचे हे एशियाई क्रीडा स्पर्धेतील चौथे सुवर्णपदक ठरले, तर प्रिथिका प्रदीप आणि चिकिता तनीपार्थी यांनी आपल्या पहिल्याच एशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याचा मान मिळवला. प्रिथिका प्रदीपच्या या यशामुळे पिंपरी-चिंचवड शहराचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात अभिमानाने झळकले आहे. शहरातील पिंपरी-चिंचवड आर्चरी असोसिएशनच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या धनुर्विद्या विकासाच्या प्रयत्नांना या यशामुळे नवी दिशा आणि प्रेरणा मिळाली आहे.

एशियन पेंट्सची हैड्रोना आणि अल्ट्रासोबत एका नवीन प्रस्तावाची घोषणा

384 चौ. फूट आकाराच्या एका भव्य मोझॅक कलाकृतीची स्थापना

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

एशियन पेंट्स वुड अढेजिव्ह्जने एशियन पेंट्स हैड्रोना आणि एशियन पेंट्स अल्ट्रा ही दोन नवीन उत्पादने लाँच केली आहेत. ही उत्पादने लाकूडकाम करणाऱ्या लोकांसाठी टिकाऊपणा, वापरण्यास सोपेपणा आणि उत्तम कामगिरी देण्यासाठी तयार करण्यात आली आहेत. या लाँचिंगच्या निमित्ताने, संपूर्ण भारतातील 250 वितरक एकत्र आले आणि त्यांनी एक आकर्षक लाकडी तयार केला. या कलाकृतीस आता आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये 'एका संस्थेद्वारे निर्माण करण्यात आलेली सर्वात मोठी लाकडी मोझॅक कलाकृती' म्हणून मान मिळाला आहे. एका चांगल्या बाँडची सुरुवात इथून होते' (A Better Bond Starts Here) या संकल्पनेवर आधारित या उपक्रमाने उत्पादनामुळे मिळणाऱ्या लाभांचे फायद्याचे एका सामयिक अनुभवात रूपांतर केले. प्रत्येक वितरकाने नवीन लाँच केलेले एशियन पेंट्स हैड्रोना अढेजिव्ह वेगवेगळ्या लाकडी पॅनेल्सवर लावले, जे नंतर त्या मोठ्या आणि आकर्षक कलाकृतीवर जोडण्यात आलं आणि अशा प्रकारे यामुळे हे व्यावसायिक भागीदार आणि नवीन उत्पादन ब्रँडच्या लाँचिंगच्या कथेचे एक अविभाज्य अंग बनले. हा उपक्रम एशियन



पेंट्स् च्या होम आणि डेकोर क्षेत्रातील व्यापक कौशल्याला दर्शवतो व अशा प्रकारे त्यांनी घरांबद्दलची आपली समज आता त्यांनी लाकडासाठी अढेजिव्हच्या क्षेत्रापर्यंत वाढवली आहे आणि लाकूडकाम क्षेत्रातील एक मुख्य गरज पूर्ण केली आहे, ती म्हणजे दीर्घकाळ टिकावू फर्निचर.

एशियन पेंट्स हैड्रोना हे नवीन प्रीमियम वॉटरप्रूफ लाकडी अॅडेसिव्ह आहे. हे प्रगत जलविरोधी पॉलिमर तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे आणि लाकूडकामाच्या कठीण कामांमध्ये टिकाऊ पकड देण्यासाठी डिझाइन केले आहे. उत्तम पसरण्याची क्षमता, सोपा वापर, उच्च बाँड स्ट्रेंथ (मजबूत पकड) आणि 10% अधिक कव्हरेज देणारे हैड्रोना फर्निचरचा पाणी आणि दमटपणापासून बचाव करून ते जास्त काळ टिकवण्यास मदत करते.

एशियन पेन्ट्स अल्ट्रा हे रोजच्या लाकूडकामासाठीचे अपग्रेड केलेले अॅडेसिव्ह आहे. हे सध्या अल्ट्रा वापरणाऱ्यांचा विश्वास कायम ठेवत, उत्तम कव्हरेज, पसरण्याची चांगली क्षमता, सोपा वापर, हवेच्या पोकळ्या दुरुस्त करण्याची चांगली क्षमता आणि मजबूत पकड देते.

हैड्रोना आणि अल्ट्रा हे जोडीने एशियन पेंट्सच्या त्याच कामाच्या हेतूने निर्माण केलेल्या अॅढेसिव्ह सोल्यूशन्सवर भर देतात व रोजच्या लाकूडकामाच्या गरजा पूर्ण करतात.

या उपक्रमाबद्दल बोलताना, एशियन पेंट्स् लिमिटेडचे एमडी आणि सीईओ (MD & CEO) अमित सिंगल म्हणाले, "एशियन पेंट्स् मध्ये, घरांबद्दलची आमची समज नेहमीच भिंतींवर nnदिसणाऱ्या रंगांच्या पलीकडे असते. याचा अर्थ अनेक उत्पादने, साहित्य, लोक आणि कुशल हात जे एकत्र येऊन दीर्घकाळ टिकणाऱ्या जागा तयार करतात. हैड्रोना आणि अल्ट्राद्वारे आमचा वुड अढेजिव्ह्ज पोर्टफोलिओचा विस्तार करत असताना आम्ही हीच जाणिव घरबांधणीच्या आणखी एका महत्त्वाच्या भागामध्ये आणत आहोत. आमचे वितरक भागीदार आमच्या या वाटचालीचे एक अविभाज्य अंग राहिले आहेत आणि हा उपक्रम त्याच भागीदारीचा एक उत्सव आहे. एकाच कलाकृतीची निर्मिती करण्यासाठी 250 वितरकांना डिस्ट्रिब्युटर्सना एकत्र आणणे हे आम्ही नेहमीच ठेवलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे - वैयक्तिक शक्ती एकत्र येतात, तेव्हा त्या काहीतरी खूप मोठे तयार करू शकतात. रेकॉर्डचा हा प्रयत्न या प्रसंगाला संस्मरणीय बनवतो, पण त्याहून मोठा आनंद हा आहे की, आम्ही त्या लोकांचा सन्मान करत आहोत जे लोक आमची ही सोल्यूशन्स देशातील ग्राहक आणि लाकूडकाम करणाऱ्या समुदायांपर्यंत पोहोचवण्यास मदत करतात."

गोजुबावीत बसपाच्या शाखेचे उद्घाटन

■ बारामती (दै. संध्या)

बारामती तालुक्यातील गोजुबावी येथे बहुजन समाज पार्टीच्या शाखेचे उद्घाटन उत्साहात करण्यात आले. बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव काळुराम चौधरी व बारामती नगरपरिषद नगरसेविका कुमारी संघमित्रा काळुराम चौधरी यांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना काळुराम चौधरी यांनी पुणे कराराचा धिक्कार करत आपल्या भाषणास सुरुवात केली.बहुजन समाज पार्टी ही केवळ राजकीय पार्टी नसून बहुजन महापुरुषांच्या विचारांचे आणि सामाजिक परिवर्तनाचे आंदोलन आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचा विचार पुढे घेऊन जाण्यासाठी पक्षाचे संघटन महाराष्ट्रासह देशभरात मजबूत करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या विचारानुसार बहुजन समाजाने सत्तारूपी शासन करणारी जमात बनण्याच्या दिशेने वाटचाल करावी. आता केवळ मागणारे न राहता समाजाच्या प्रश्नांवर निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सहभागी होऊन देणारे होण्याची गरज आहे, असे आवाहन काळुराम चौधरी यांनी केले.

समाजातील तरुण-तरुणींनी तसेच



बारामती तालुक्यात पक्षाच्या शाखा स्थापन करून स्थानिक पातळीवर संघटन मजबूत करण्याची मोहीम सुरू आहे.सामाजिक प्रश्न,बहुजन महापुरुषांचे विचार आणि संघटनात्मक बांधणीच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यावर पक्षाकडून भर दिला जात आहे.

- काळुराम चौधरी, प्रदेश महासचिव, बसपा

बहुजन समाजातील सर्व घटकांनी बहुजन समाज पार्टीच्या विचारांशी जोडून घेत पक्षाच्या संघटनात्मक बांधणीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

दरम्यान, बारामती तालुक्यात बहुजन समाज पार्टीची संघटन बांधणी युद्धपातळीवर सुरू असून गावोगावी शाखा स्थापन करण्यावर भर दिला जात आहे.पक्षाच्या संघटनात्मक विस्तारामुळे कार्यकर्त्यांचा ओघही वाढत असल्याचे यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

कार्यक्रमास बहुजन समाज पार्टीचे बारामती विधानसभा अध्यक्ष दयानंद पिसाळ, प्रभारी संदीप खांडेकर, प्रवीण शिंदे, रोहित जगताप, दिलीप भोसले, सचिन जाधव, अमोल लोंढे, वाल्मीक आढाव, कैलास बगाडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

संकटकाळात आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल लाईफ इन्शुअरन्सकडून मदतीचा हात

■ पुरंदर (दै. संध्या)

■ कंपनीकडून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये प्रति वैयक्तिक दाव्यापोटी सरासरी १५ लाखांपर्यंत विमा मंजूर

आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल लाईफ इन्शुअरन्सने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये वैयक्तित मृत्यू दाव्यांपोटी मृत व्यक्तींच्या कुटुंबांना सरासरी १५ लाखांचे वाटप केले आहे. कंपनीने या दाव्यांच्या भरपाई रकमेच्या बाबतीत सलग दुस-या वर्षी या व्यवसायातील आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे. संकटकाळात कुटुंबीयांना आर्थिक स्थैर्य देण्याच्या ध्येयाप्रती कंपनी यानिमित्ताने आपली कटिबद्धता दर्शवते. विमा उद्योगातील गेल्या सहा वर्षांतील सार्वजनिक आकडेवारीनुसार, आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल इन्शुअरन्सचे सरासरी वैयक्तित मृत्यू दावा भरपाई मूल्य आता वाढले आहे. आर्थिक वर्ष २०२१ साली हे मूल्य १० लाखांवर नोंदवले गेले होते. हे मूल्य आता २०२६ साली १५ लाखांवर पोहोचले आहे. गेल्या ४-५ वर्षांत हे सरासरी दावा मूल्य १४ ते १५ लाखांच्या आसपास स्थिर झाल्याचे दिसून येते. वर्षागणिक लोकांचे उत्पन्न, कर्जे आणि कौटुंबिक जबाबदा-यांमध्ये बदल होतात, त्यामुळे आपल्या वाढत्या गरजा आणि जबाबदा-यांनुसार पॉलिसीधारकांनी आपल्या विमा संरक्षणाचा वेळोवेळी आढावा घेण्याची गरजही आता प्रकर्षाने जाणवू लागली आहे. याबाबतीत आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल लाईफ इन्शुअरन्सचे अंडरटायटिंग एण्ड रिटेल क्लेम्स प्रमुख श्री. सारंग गोखले यांनी माहिती दिली. ते म्हणाले, "जीवन विमा हा कठीण काळात आर्थिक सुरक्षितता देण्याच्या एका आश्वानावर आधारित आहे. आम्ही आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ५ हजार १४९ कोटींचे दावे मंजूर केले आहेत. याशिवाय, कंपनीचा दावा निपटारा दर ९९.३ टक्क्यांवर नोंदवला गेला आहे. सर्व आवश्यक कागदपत्रे नोंदवल्यानंतर बिगर-तपासणी दाव्यांसाठी सरासरी केवळ १.१ दिवसांचा वेळ पुरेसा असतो. हे यश आम्ही ग्राहकांना आणि त्यांच्या कुटुंबांना दिलेल्या शब्दाला बांधील असल्याचे सिद्ध करते. आम्ही सातत्याने दाव्यांची प्रक्रिया सोपी करत आहोत. तंत्रज्ञानावर आधारित सेवा पुरवत आहोत. यामुळे बाधित कुटुंबांना विनाविलंब मदत मिळते. यासोबतच, ग्राहकांनी त्यांच्या बदलत्या जीवनशैलीनुसार आणि ध्येयांनुसार आपल्या विमा संरक्षणाचा वेळोवेळी आढावा घ्यावा, यासाठीही आम्ही त्यांना प्रोत्साहित करत असतो."



बॉक्सिंगमध्ये ज्ञानसागरची सुवर्णझेप; जिल्हास्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुलचे यश

■ बारामती (दै. संध्या)

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आयोजित जिल्हास्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुल,सावळच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत तीन सुवर्णपदकांची कमाई केली.या उल्लेखनीय यशामुळे विजेत्या विद्यार्थ्यांची आगामी विभागस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. एम.आय.टी. कॉलेज,लोणी काळभोर येथे दिनांक २९ व ३० सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या १७ व १९ वर्षाखालील मुलांच्या जिल्हास्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धापार पडल्या.या स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुलच्या खेळाडूंनी विविध वजन गटांत प्रतिस्पर्ध्यांवर मात करत प्रथम क्रमांक पटकावला.यामध्ये ४६ किलोखालील वजन गटात राजवीर हिम्मत कौले याने प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावले. ४९ ते ५२ किलो वजन गटात शिवराजे हिम्मत कौले याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक मिळवला,तर ६६ ते ६९ किलो वजन गटात नमन भारत होले याने प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

या तिन्ही खेळाडूंनी आपल्या जिद्दीच्या, मेहनतीच्या आणि उत्कृष्ट खेळाच्या जोरावर जिल्हास्तरीय स्पर्धेत यश संपादन केले. विशेष म्हणजे,या तिन्ही सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची आगामी विभागीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामुळे आता विभागीय स्तरावरही आपल्या खेळाची चमक दाखवण्याची संधी या खेळाडूंना मिळणार आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रालाही विशेष महत्त्व देणाऱ्या ज्ञानसागर गुरुकुलच्या या यशामुळे संस्थेच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानात भर पडली आहे. खेळाडूंना नियमित सराव, योग्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यामुळे त्यांनी हे यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.सागर मानसिंग आटोळे,संस्थेचे पदाधिकारी,प्राचार्य,क्रीडा शिक्षक व सर्व शिक्षकांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले.तसेच आगामी विभागीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

लासुर्णेत संविधान भवनाच्या उभारणीला सुरुवात; २ कोटींच्या कामाचे भूमिपूजन

ग्रामीण भागातील पहिले संविधान भवन साकारण्यास सुरुवात

■ वालचंदनगर (दै. संध्या)

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील पहिले संविधान भवन इंदापूर तालुक्यातील लासुर्णे येथे साकारले जाणार असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या बांधकामाचे भूमिपूजन सोमवारी (दि. २८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात पार पडले. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या विशेष प्रयत्नांतून या प्रकल्पासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक बुद्धवंदनेने झाली. त्यानंतर उपस्थितांनी 'जय भीम'च्या घोषणा देत उत्साह व्यक्त केला.

राघव कन्स्ट्रक्शन बारामती फर्मचे अभियंता अविनाश सूर्यवंशी यांनी संविधान भवनाचा आराखडा उपस्थितांसमोर सादर केला. ग्रामपंचायतीत झालेल्या बैठकीदरम्यान ग्रामस्थांच्या सूचना जाणून घेऊन त्यानुसार आराखड्यात आवश्यक बदल करण्यात आले असून, अंतिम आराखडा निश्चित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. भूमिपूजनाचा कार्यक्रम



पूर्ण झाल्यानंतर संविधान भवनाच्या प्रत्यक्ष बांधकामाची आखणी सुरू करण्यात आली.

इंदापूर पंचायत समितीचे सभापती हर्षवर्धन लोंढे यांनी बांधकाम दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावे यासाठी ग्रामस्थांनी कामाच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवण्याचे आवाहन केले. आगामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीपूर्वी संविधान भवनाच्या पहिल्या मजल्याचे काम पूर्ण करण्याची मागणी यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी केली. त्यावर अभियंता अविनाश सूर्यवंशी यांनी काम नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

तसेच आठवडाभरात संविधान भवनाचा नवीन थ्रीडी आराखडा तयार करून त्याची माहिती देणारा फ्लेक्स लावण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य संतोष पिपा लोंढे, माजी ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ लोंढे, संतोष लोंढे, नेताजी लोंढे, वैभव लोंढे, प्रमोद चव्हाण, शरद लोंढे, अमोल लाला लोंढे, संदेश लोंढे, कुंडलिक लोंढे, हृदयनाथ लोंढे, निकीत लोंढे, अमोल लोंढे, प्रवीण लोंढे, अॅड. मंगेश लोंढे, अजित लोंढे, धर्मेंद्र लोंढे यांच्यासह ज्येष्ठ नागरिक विनायक लोंढे, जगन्नाथ लोंढे, सुरेश शिंदे आदी उपस्थित होते.



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
गुरुवार, दि. ०१ ऑक्टोबर २०२६
दैनिक संध्या निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



पिंपरी-चिंचवड 'एज्युकेशन हब'च्या संकल्पाला आता संशोधनाची जोड!

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवडला 'एज्युकेशन हब' बनवण्याच्या संकल्पाला आता प्रगत संशोधनाची जोड मिळणार आहे. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि जेएसडब्ल्यू प्रोजेक्ट्स यांच्यात चिखली येथील रिसर्च पार्कमध्ये स्वदेशी बॅटरी संशोधन व विकास केंद्र उभारण्यासाठी सामंजस्य करार झाला आहे. ८०० कोटींहून अधिक गुंतवणूक प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पाचे भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी स्वागत केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात उद्योग, संशोधन आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत असल्याचे लांडगे यांनी म्हटले आहे. चिखलीतील हा प्रकल्प पिंपरी-चिंचवडच्या शैक्षणिक आणि औद्योगिक क्षमतेला नवी दिशा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. करारावर सीओईपीतर्फे कुलसचिव डॉ. डी. एन. सोनावणे आणि जेएसडब्ल्यू समूहातर्फे कार्यकारी उपाध्यक्ष नरेश ललवाणी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. प्रस्तावित केंद्रात लिथियम-आयन, सोडिअम-आयन आणि इतर प्रगत तंत्रज्ञानावर आधारित बॅटरी सेलचे संशोधन, प्रोटोटायपिंग व प्रमाणीकरण होणार आहे. केंद्र दोन टप्प्यांत विकसित करण्याचे नियोजन असून, त्यातून एक हजार रोजगारसंधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांना आणि युवा अभियंत्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानावर प्रत्यक्ष काम करण्याची संधीही उपलब्ध होऊ शकते. या भागीदारीबाबत जेएसडब्ल्यू समूहाचे अध्यक्ष सज्जन जिंदाल यांनी, "सेल हे या शतकातील नवीन इंधन असून हे सेल भारतातच तयार करण्याची वेळ आली आहे," असे म्हटले आहे. सीओईपीसोबतची भागीदारी उद्योग, संशोधन आणि शिक्षण क्षेत्राला नवा आयाम देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पिंपरी-चिंचवडला 'एज्युकेशन हब' म्हणून विकसित करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे आमदार लांडगे यांनी सांगितले.

सरकारच्या योजनांची अंमलबजावणी करणे हेच लोकप्रतिनिधींचे कर्तव्य

वाकड : दैनिक संध्या

केंद्र आणि राज्य सरकार योजना बनवते, परंतु त्या योजना यशस्वीपणे लोकांपर्यंत घेऊन जाणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य असते. योजनेचा फक्त प्रचार पुरेसा नाही, तर त्याची संपूर्ण अंमलबजावणी झाल्यावर लोकांच्या चेहऱ्यावर येणारे समाधान हीच कोणत्याही लोकप्रतिनिधीची ताकद असते. अशा शब्दात प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी भाजपा नगरसेवक राहुल कलाटे यांनी आयोजित केलेल्या लाभार्थी शिबिराचे कौतुक केले. आज (दि. २९ सप्टेंबर) वाकडमध्ये भाजपा नगरसेवक राहुल कलाटे यांच्या जनसंपर्क कार्यालयातर्फे आयोजित लाभार्थी शिबिरात भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यावेळी ते बोलत होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या 'सेवा संकल्प अभियाना'च्या निमित्ताने वाकड येथे 'लाभार्थी शिबिरा'अंतर्गत प्रातिनिधिक स्वरूपात लाभ वितरण व प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लाभार्थ्यांना विविध शासकीय योजना व सुविधांचा लाभ प्रातिनिधिक स्वरूपात प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना रविंद्र चव्हाण म्हणाले, "तंत्रज्ञान आणि संवाद यंत्रणांचा उत्तम मेळ घालून राहुल कलाटे यांनी 'जनकल्याण शिबिर' आयोजित केले आहेत. आतापर्यंत कलाटे यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून ६४ शिबिरं आयोजित करण्यात आले आणि त्यातून सुमारे ८५०० हून अधिक लाभार्थ्यांना ते समाधान मिळवून देऊ शकले हे कौतुकास्पद आहे. कारण योजनेची संपूर्ण अंमलबजावणी महत्त्वाची असते." "देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः 'सेवा' भावनेने कार्यरत असतात. त्याच विचारांचा पायंडा पुढे नेत नगरसेवक राहुल कलाटे राबवत असलेल्या उपक्रमाचे विशेष कौतुक वाटते. आपल्या समस्या ऐकून घेणारे कोणीतरी हक्काचे माणूस आहे हा विश्वास आणि दिलासा कलाटे यांच्या कार्यपद्धतीतून इथल्या नागरिकांना मिळतोय याबद्दल खात्री आहे." असेही चव्हाण यावेळी बोलताना म्हणाले.

२ कोटी ७७ लाखांच्या एक्स-रे मशीन खरेदीत मोठा आर्थिक घोटाळा?

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय साहित्य खरेदीसाठी काढण्यात आलेल्या GeM निविदा क्रमांक GEM/2026/B/7797530 मधील 1000 MA डिजिटल रेडिओग्राफी (Digital Radiography) सिस्टम खरेदीवरून वाद निर्माण झाला आहे. या मशीनसाठी महापालिकेने 2 कोटी 77 लाख 56 हजार रुपये इतके अंदाजपत्रकीय मूल्य निश्चित केल्याने त्याच्या दराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य संदीप वाघेरे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना पत्र देऊन संबंधित निविदा प्रक्रिया तातडीने स्थगित करून रद्द करण्याची तसेच संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. वाघेरे यांनी दिलेल्या पत्रानुसार, निविदेतील तांत्रिक तपशीलाशी संबंधित मूळ उत्पादक कंपनीने राजस्थानमधील कोटा वैद्यकीय महाविद्यालयाला याच प्रकारचे 1000 MA क्षमतेचे मशीन सुमारे 1 कोटी 40 लाख रुपयांना पुरविले आहे. तसेच याच वर्षात 800 MA क्षमतेचे मशीन सुमारे 1 कोटी 10 लाख रुपयांना विकण्यात आल्याचा उल्लेखही पत्रात करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, इतर शासकीय संस्थांमध्ये 1000 MA मशीनची खरेदी सुमारे 1.40 कोटी रुपयांत झालेली असताना, पिंपरी-चिंचवड महापालिकेने त्याच क्षमतेच्या मशीनसाठी तब्बल 2.77 कोटी रुपयांचे अंदाजित मूल्य कशाच्या आधारावर निश्चित केले, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.



कामगारांना न्याय देण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केले

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण : चिंचवड मध्ये माथाडी पदाधिकारी राज्यस्तरीय मेळावा संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

जुन्या कामगार कायद्यामुळे भांडवलशाही मंडळी कामगारांना अडचणीत आणण्याचे प्रयत्न करीत होती. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुधारणा करून कामगारांना न्याय देण्याचे काम केले आहे. नवीन कामगार कायद्यातून कामगारांना त्यांच्या कुटुंबीयांना भविष्य निर्वाह निधी, आभा कार्डद्वारे पूर्ण कुटुंबासाठी आरोग्य विमा लाभ यासह अनेक सुविधा मिळणे आता सुलभ झाले आहे. या कायद्याच्या चौकटीत कामगारांना संरक्षण मिळत आहे. अनुप मोरे यांच्या नेतृत्वाखाली माथाडी संघटनेच्या राष्ट्रमातेचा समावेश असणारा लोगो हा राष्ट्र प्रथम हे कर्तव्य दर्शवणारा आहे. या संघटनेचे ५० हजार सदस्य नोंदणीचे ध्येय पूर्ण होण्यासाठी भारतीय जनता पार्टी कामगारांच्या पाठीशी पूर्ण ताकतीने उभी राहील असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी चिंचवड येथे केले.

भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक, जनरल कामगार युनियन (रजि.) या संस्थेचा राज्यस्तरीय पदाधिकारी मेळावा मंगळवारी (दि. २९) चिंचवड येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी पिंपरी चिंचवडचे महापौर रवि लांडगे, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश दादा लांडगे, शंकर जगताप, उमाताई खापरे, पक्षनेते प्रशांत शितोळे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर, माजी उपमहापौर व ज्येष्ठ नगरसेवक तुषार हिंगे, अध्यक्ष विजय हरगुडे, जयदीप खापरे, नगराध्यक्ष संतोष दाभाडे, अक्षय वरघडे, राकेश सणस, वसीम शेख आदींसह हजारो माथाडी कामगार उपस्थित होते. यावेळी नवीन निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला. रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले की, अनुप मोरे सारखा युवा कार्यकर्ता राज्यात माथाडी कामगारांचे नेतृत्व सक्षमपणे करीत आहे. अल्पावधीत या कामगार संस्थेचे १५ हजार सदस्य नोंदणी केली आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कामगारांनी कामगारांच्या कुटुंबीयांच्या हितासाठी निर्णय घेत आहेत. देशात मोदी यांच्या नेतृत्वाखाली विविध योजनांच्या माध्यमातून २५ कोटींपेक्षा अधिक नागरिकांना दारिद्र्य रेषेतून बाहेर काढण्याचे काम केले आहे. भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक, जनरल कामगार युनियन (रजि.) या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनुप मोरे यांनी स्वागत करताना सांगितले की, ही संघटना पक्षाच्या ध्येय धोरणानुसार २०१४ मध्ये स्थापन केली आहे. या माथाडी युनियन चे महाराष्ट्रात १५ हजार सदस्य सभासद झाले आहेत. आहेत. २०२९ मध्ये राज्यात आणि देशात भाजपची सत्ता आणण्यासाठी माथाडी युनियनचे ५० हजार सभासद नोंदणीचे ध्येय ठेवून काम करीत आहे असे वचन अनुप मोरे यांनी कामगारांच्या साक्षीने महाराष्ट्र भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना दिले तसेच राज्यात आणि केंद्रात भाजपची सत्ता येण्यासाठी कामगारांनी तुम्ही आमच्या पाठीशी राहावे असे कामगारांना आवाहन केले. कामगारांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवू कसा शब्द दिला. नेत्यांनी मला प्रदेश पातळीवर काम करण्याची संधी दिली याचे सोने करून कामगारांच्या न्यायासाठी लढत राहू असेही अनुप मोरे म्हणाले. प्रास्ताविक ॲड. विजय हरगुडे, सूत्रसंचालन अक्षय मोरे आभार संतोष कांबळे यांनी मानले.

एसबीपीसीओएडी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

आंतरराष्ट्रीय स्तरावर वास्तुविशारद क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्पर्धा आहे. तरीही भारतात वास्तुविशारद क्षेत्रात अनेक संधी देखील उपलब्ध आहेत. जिथे कमतरता असते तिथे संधी उपलब्ध होते याचा उपयोग करून घेऊन आपले करिअर घडवावे असे मार्गदर्शन ज्येष्ठ वास्तुविशारद व आंतरराष्ट्रीय लँडस्केप डिझाईनर डॉ. महेश नामपुरकर यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन (एसबीपीसीओएडी) मध्ये २०२५ - २६ मधील बॅचलर ऑफ आर्किटेक्टच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट पुणे सेंटर चेअरमन आर्किटेक्ट शितेश अग्रवाल, एसबीपीसीओएडी प्राचार्या डॉ. स्मिता सूर्यवंशी, यशस्वी विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

नामपूरकर यांनी सांगितले की, वास्तुशास्त्र हा एक अतिशय सुंदर व्यवसाय आहे. विद्यार्थ्यांनी शिकण्याची आणि जे हवे आहे ते साध्य करण्याची जिद्द बाळगायला हवी. हे क्षेत्र तुम्हाला स्वातंत्र्य आणि सामर्थ्य देते. तसेच, तुम्हाला कुठे स्थायिक व्हायचे आहे, याची निवड करण्याचे स्वातंत्र्य आणि आत्मविश्वास मिळतो. देशसेवा करण्याचे हे एक चांगले क्षेत्र आहे.स्कार्स ऑफ इंडिया - द अनटोल्ड बॅटल्स या पुस्तकासाठी स्वरा मुसळे, कलर्स ऑफ धर्म या कलरिंग बुक साठी गार्गी साठे यांना बक्षीस देण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ मधील ४३ गुणवंत विद्यार्थी आणि विविध क्षेत्रात यश मिळवलेल्या माजी विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात आला. तसेच २०२६-२७ च्या विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष अमोद भेगडे, उपाध्यक्ष मृण्मयी चौधरी, सचिव कुशा गोयल, सांस्कृतिक प्रमुख सायली केसकर, क्रीडा प्रमुख मृदुल मारळ व विविध क्लब मध्ये निवड झालेल्या पदाधिकारी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. अजय हरताळे, इंटरनल सीनियर सुपरवायझर ऋजुता पाठक, लक्ष्मण तोरगळे, किसन काळे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग घेतला. सूत्रसंचालन प्रा. शिवा शिशोविया व प्रा. दक्षा देशमुख यांनी केले. आभार प्राचार्या डॉ. स्मिता सूर्यवंशी यांनी मानले.



माहिती पुस्तिकेचे प्रकाशन

यावेळी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. माजी विद्यार्थिनी आर्किटेक्ट हरश्री नखरानी यांना २०२५ या वर्षातील सर्वोत्तम विद्यार्थी प्रेरणा चषक देऊन गौरवण्यात आले. तसेच एमपीएससी स्पर्धा परीक्षेत असिस्टंट टाऊन प्लॅनर म्हणून निवड झाल्याबद्दल काजल थिटे, फोएड यंग वुमन अचीवर ऑफ द इयर हॉस्पिटलिटी साठी अंकिता पाटील, स्ट्राइड मेक स्पेस डिझाईन कॉम्पिटिशन मध्ये तिशा केला आणि आदर्श प्रधान तसेच पर्यावरण, शाश्वतता, वादविवाद पोस्टर डिझाईन बर्ड हाऊस डिझाईन आणि फोटोग्राफी मध्ये ओमकुमार बागले, जानवी भोसले, दिशा प्रधान, सिद्धी सावंत, भार्गवी पोहणे, आदित्य काळे, कृतिका चनी, प्रतिभा काकडे, सानिका काळे या बक्षीस विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. कॅम्प फोटोग्राफी मध्ये प्रथम क्रमांक राधिका मंत्री, द्वितीय क्रमांक सानिका सुतार, तृतीय क्रमांक संदली मेंधळकर, विशेष सहभागासाठी मृदुल मारळ, मृण्मयी चौधरी, ऐश्वर्या जाधव यांचाही गौरव करण्यात आला.

निगडीतील रस्त्यावरील खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करा



■ पिंपरी(दै. संध्या)

निगडी येथील मारुती मंदिर ते निगडी सिग्नल या मार्गावर सुरू असलेल्या मेट्रोच्या कामामुळे रस्ता अरुंद झाला असून, ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून नागरिक आणि वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात मनसेच्या वतीने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या बीआरटीएस विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले. निगडी मारुती मंदिर ते निगडी सिग्नल या मार्गावर मेट्रोचे काम सुरू असल्याने वाहतुकीसाठी उपलब्ध असलेला रस्ता अरुंद झाला आहे. त्यातच रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहतुकीचा वेग मंदावत असून दिवसभर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

रस्त्यावरील खड्ड्यांमुळे विशेषतः दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच या मार्गावरील स्पीड ब्रेकर पुसट झाले असून ते वाहनचालकांना स्पष्टपणे दिसत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे खड्डे तातडीने बुजविण्यासोबतच स्पीड ब्रेकरची रंगरंगोटी करून ते स्पष्टपणे दृश्यमान करावेत, अशी मागणी मनसेने केली आहे.

वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. प्रशासनाने त्वरित कार्यवाही न केल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी मनसेचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सचिन चिखले, उपविभाग अध्यक्ष स्वप्निल महांगरे, शाखाध्यक्ष सागर बहुले आणि रोहित काळभोर आदी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवडमध्ये शासकीय 'एमबीबीएस' महाविद्यालय सुरू करा!

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

शहरात शासकीय अथवा महापालिकेचे एमबीबीएस महाविद्यालय सुरू करण्याची मागणी आमदार महेश लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. वायसीएम रुग्णालयाशी संलग्न महाविद्यालयाला तत्त्वतः मान्यता देऊन त्यासाठी जागा, निधी आणि मनुष्यबळाचा सविस्तर प्रस्ताव निश्चित मुदतीत मागवावा, असे साकडे त्यांनी घातले आहे.

पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या सुमारे ४० लाखांपर्यंत पोहोचली असताना शहरात सरकारी किंवा महापालिकेचे एमबीबीएस महाविद्यालय नसल्याचा मुद्दा लांडगे यांनी उपस्थित केला आहे. वायसीएम रुग्णालयाशी संलग्न संस्थेत एमडी आणि एमएस पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहेत; मात्र एमबीबीएससाठी स्थानिक विद्यार्थ्यांना पुणे, इतर जिल्हे किंवा खासगी संस्थांकडे जावे लागते, असे पत्रात नमूद आहे.

खासगी वैद्यकीय शिक्षणाचा वाढता खर्च मध्यमवर्गीय कुटुंबांना पेलणे कठीण होत असल्याचे लांडगे यांनी म्हटले आहे. पत्रात दिलेल्या अंदाजानुसार, काही खासगी संस्थांमध्ये साडेचार वर्षांचे शिक्षण शुल्क, निवास आणि इतर शुल्क मिळून एमबीबीएसचा खर्च सुमारे ₹१.४८ कोटी होऊ शकतो. हा सर्व महाविद्यालयांना लागू असलेला दर नसून पत्रातील खर्चाचा अंदाज आहे. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या निर्देशानुसार एमबीबीएसचे शिक्षण शुल्क साडेचार वर्षांच्या शैक्षणिक कालावधीपुरतेच आकारायचे आहे.

महाविद्यालयासाठी महापालिकेचा ठोस प्रस्ताव अद्याप तयार झालेला नसल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून मिळाल्याचेही लांडगे यांनी पत्रात म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, नगरविकास विभाग आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांची संयुक्त बैठक बोलवावी, अशी त्यांची मागणी आहे. जागा, आर्थिक तरतूद, आवश्यक मनुष्यबळ आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या निकषांचा समावेश असलेला प्रस्ताव प्रशासनाने निश्चित कालमर्यादेत सादर करावा; त्यानंतर राज्य शासनाने मान्यता व निधीबाबत निर्णय घ्यावा, असेही त्यांनी सुचवले आहे.

गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांतील गुणवंत विद्यार्थ्यांना परवडणारे वैद्यकीय शिक्षण उपलब्ध व्हावे आणि शहराच्या वाढत्या आरोग्यसेवेसाठी डॉक्टर घडावेत, यासाठी मुख्यमंत्र्यांनी या विषयात वैयक्तिक लक्ष घालावे, अशी विनंती लांडगे यांनी केली आहे.

पिंपरी-चिंचवडमधील गुणवंत विद्यार्थ्यांना एमबीबीएस शिक्षणासाठी शहराबाहेर जावे लागते किंवा खासगी महाविद्यालयांचा मोठा खर्च करावा लागतो. वायसीएम रुग्णालयाशी संलग्न शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यास सामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांना संधी मिळेल आणि शहराच्या आरोग्यसेवेलाही बळ मिळेल. यासाठी राज्य शासनाने महापालिकेकडून कालबद्ध प्रस्ताव मागवून निर्णय घ्यावा. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे घातले आहे, असे महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे यांना सांगितले.

थोडक्यात पण महत्वाचे



सेवा सेतू अभियानातून जेजुरीत वीज ग्राहकांना सोलर योजनांची माहिती

जेजुरी : दैनिक संध्या

महावितरणच्या सेवा सेतू अभियानांतर्गत जेजुरी नगरपरिषद येथे वीज ग्राहकांसाठी माहितीपर शिबिर घेण्यात आले. जेजुरी शहर व पंचक्रोशीतील ग्राहकांना या शिबिरामधून विविध योजना व ग्राहक सेवांची माहिती देण्यात आली. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत घरगुती ग्राहकांना छतावरील सौर प्रकल्पासाठी अनुदान उपलब्ध असून, २ किलोवॅटपर्यंत ३० रुपये हजार प्रति किलोवॅट आणि त्यापुढील अतिरिक्त क्षमतेसाठी १८ रुपये हजार प्रति किलोवॅट, कमाल ७८ रुपये हजारांपर्यंत अनुदान दिले जाते. या योजनांसाठी अर्ज महावितरणच्या ऑनलाइन प्रणालीद्वारे करता येत असून, प्रक्रिया सुलभ व पेपरलेस पद्धतीने राबविण्यात येत असल्याची माहिती निरा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता शरद अवताडे यांनी दिली. तसेच दारिद्र्यरेषेखालील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घरगुती ग्राहकांसाठी उपलब्ध शासकीय योजनांमधील पात्रता, अनुदान व लाभ घेण्याची प्रक्रिया याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. स्मार्ट सोलरसह इतर योजनांची माहिती देताना, नवीन वीज जोडणी, नावात बदल किंवा दुरुस्ती आणि वीजबिलासंबंधी तक्रारींची दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात आल्याचे अभियंता संतोष कर्णवळ यांनी बोलताना सांगितले. या शिबिरावेळी निरा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता शरद अवताडे, कनिष्ठ अभियंता सुप्रिया देवकाते, उच्चस्तर लिपिक सागर चव्हाण, जेजुरी शहराचे सहाय्यक अभियंता संतोष कर्णवळ, जेजुरी ग्रामीणचे सहाय्यक अभियंता श्रीरंग मुत्तेपवार, प्रधान तंत्रज्ञ सचिन दरेकर व तंत्रज्ञ लहूराज आवटे, माजी नगरसेवक सत्यवान उबाळे, सनरायझर एनर्जी सोल्यूशनचे प्रवीण झगडे, मयुर एंटरप्राइजेसचे मयुर कुदळे यांसह महावितरणचे ग्राहक, स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पांगारे पुरंदरचा झेंडा सातासमुद्रापार ; काकडेला ऑस्ट्रेलियात विशेष सन्मान

नाझरे सुपे पुरंदर : दैनिक संध्या



पुरंदर तालुक्यातील पांगारे गावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. गावचे पहिले सरपंच ब. पा. काकडे यांचा नातू आणि प्रा. राजेश काकडे यांचे चिरंजीव प्रज्ञेश काकडे याने शैक्षणिक क्षेत्रात घवघवीत यश मिळवत गावाचे, आई-वडिलांचे आणि देशाचे नाव सातासमुद्रापार उज्ज्वल केले आहे. प्रज्ञेश याने पुण्यातील नामांकित एमआयटी महाविद्यालयातून बी.टेकची पदवी प्रथम श्रेणीत पूर्ण केली. त्यानंतर त्याने पुढील शिक्षणासाठी ऑस्ट्रेलियातील जगप्रसिद्ध आरएमआयटी विद्यापीठ, मेलबर्न येथे एमएस अर्थात पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश मिळविला. तेथेही त्याने आपल्या अभ्यासातील सातत्य आणि चिकाटी कायम ठेवत विशेष प्राविण्यासह पदवी संपादन केली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल आरएमआयटी विद्यापीठाच्या वतीने पुढील महिन्यात मेलबर्न येथे विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी प्रज्ञेशसह त्याचे आई-वडील प्रा. राजेश काकडे आणि सौ. काकडे यांना विशेष निमंत्रित करण्यात आले आहे. या सन्मानासाठी भारत सरकारने काकडे दाम्पत्याचा पारपत्र मंजूर करून सर्व आवश्यक प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून दिली आहे. एका सर्वसामान्य कुटुंबातील मुलाने जिद्द, मेहनत आणि मनापासून अभ्यासाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे. आजच्या धावपळीच्या युगात तरुणाईसमोर अनेक प्रलोभने असताना प्रज्ञेशने केवळ अभ्यासावर लक्ष केंद्रित करून हे यश खेचून आणले आहे. मुलांनी मनापासून कष्ट घेतले तर यश नक्कीच मिळते आणि आपल्या गावाचे, आई-वडिलांचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करता येते, हेच त्याने कृतीतून दाखवून दिले आहे. प्रज्ञेशच्या या दैदिप्यमान यशाबद्दल पुणे जिल्हा पत्रकार संघ, पुरंदर तालुक्यातील विविध सामाजिक संघटना, ग्रामस्थ, नातेवाईक आणि सर्वच स्तरातून त्याचे कौतुक आणि अभिनंदन होत आहे. पांगारे गावात सध्या आनंदाचे वातावरण असून गावातील पहिली पिढी ते आजची तिसरी पिढीपर्यंत शिक्षणाचा वारसा कसा जपला जातो याचे हे उत्तम उदाहरण असल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. विद्येच्या जोरावर जागतिक पटलावर आपली ओळख निर्माण करणाऱ्या प्रज्ञेशच्या पुढील वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

शिरूरमध्ये अल्पवयीन मुलीवरील अत्याचारप्रकरणी एकास अटक

कवठे येमाई : दैनिक संध्या

अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी आकाश अमोल काळे यास अटक करण्यात आली असून, अन्य आरोपींवर कायदेशीर कारवाई सुरू आहे. शिरूर पोलिसांच्या माहितीनुसार, जून ते जुलै २०२६ दरम्यान आरोपीने पीडितेवर अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर शिवीगाळ, दमदाटी तसेच २८ सप्टेंबर रोजी जीवे मारण्याची धमकी व मारहाण केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी गु.र.नं. ८६१/२०२६ अन्वये गुन्हा दाखल असून तपास पोलीस उपनिरीक्षक शेळके करीत आहेत.अल्पवयीन पीडितेची ओळख उघड करणारी कोणतीही माहिती सोशल मीडियावर प्रसारित करू नये,असे आवाहन पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी केले आहे.

अंगणवाडी क्रमांक ५ जाधववाडी येथे वेलकम मेळाव्याचे आयोजन

पुरंदर : दैनिक संध्या

शासनाच्या नवचेतना व आधारशिला कार्यक्रमांतर्गत वेलकम मेळाव्यांमुळे बालकांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक विकास होईल अशी प्रतिपादन पुरंदर तालुका एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी अनिल कांबळे यांनी केले. जाधववाडी (ता. पुरंदर) येथील दिवे ग्रामपंचायत अंतर्गत जाधववाडी क्रमांक ५ ही डेमो अंगणवाडी म्हणून निवडली आहे येथे नवचेतना व आधारशिला कार्यक्रमांतर्गत वेलकम मेळावाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्घाटन प्रसंगी सर्व अंगणवाडी सेविका, बालकांच्या मातांना मार्गदर्शन करताना श्री. कांबळे बोलत होते.

सोमेश्वर कारखाना निवडणुकीचे वातावरण तापले

राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांत चर्चेची चर्चा;ठाकरे गट-रासपामध्येही गाठीभेटी,स्वबळाच्या तयारीने वाढवली उत्सुकता

■ बारामती (दै. संध्या)



बारामती तालुक्यातील श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीची रणधुमाळी सध्या चांगलीच रंगली आहे.विविध राजकीय पक्ष,गट आणि इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीच्या तयारीला वेग दिला असून, उमेदवारी अर्ज दाखल करण्यापासून ते पॅनेल बांधणीपर्यंतच्या हालचालींना जोर आला आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार),भाजपा,शिवसेनेचे दोन्ही गट,राष्ट्रीय समाज पक्ष,शेतकरी कृती समिती तसेच विविध स्थानिक गट आणि अपक्ष इच्छुकांकडून निवडणूक लढविण्याची तयारी सुरू असल्याचे चित्र आहे.त्यामुळे निवडणूक प्रत्यक्षात रंगणार की शेवटच्या टप्प्यात सर्वानुमते काय निर्णय घेणार याकडे कारखान्याच्या सभासदांचे लक्ष लागले आहे

राजकीय बैठका आणि गाठीभेटींना वेग आला आहे.सोमेश्वर कारखाना निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वरिष्ठ पातळीवर विविध राजकीय गटांमध्ये चर्चा सुरू असल्याचे चित्र आहे.विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येणार का,याबाबत स्थानिक राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

दरम्यान, 25 सप्टेंबर रोजी शरद पवार यांच्या पुढाकाराने बिनविरोध निवडणुकीच्या शक्यतेवर पवार कुटुंबीयांची बैठक झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. मात्र, त्यानंतर प्रत्यक्षात कोणते अंतिम राजकीय समीकरण तयार होते,

हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.तसेच ठाकरे गट-रासपामध्येही चर्चेला वेग आला आहे.दुसरीकडे,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुकाध्यक्ष हनुमंत भापकर आणि राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार जालिंदर लकडे यांच्यात नुकतीच चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे.या चर्चेत एकत्रितपणे निवडणूक लढण्याबाबत विचारविनिमय झाल्याचे सांगितले जात असले,तरी या संभाव्य आघाडीबाबत अधिकृत अंतिम निर्णय जाहीर झालेला नाही.त्यामुळे आगामी काही दिवसांत या चर्चेला कोणते स्वरूप येते,हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.काही गट स्वबळावर मैदानात उतरण्याच्या तयारीत एकीकडे संभाव्य आघाड्या आणि राजकीय जुळवाजुळवीच्या चर्चा सुरू असताना दुसरीकडे काही पक्ष आणि गटांनी स्वबळावर निवडणूक लढविण्याची तयारी सुरू ठेवली आहे. ाजपा,शिवसेना,राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट तसेच शेतकरी पॅनेल आणि स्थानिक इच्छुकांकडून स्वतंत्र मोर्चेबांधणी सुरू असल्याचे वृत्त यापूर्वीही समोर आले आहे.त्यामुळे सोमेश्वरच्या निवडणुकीत एकापेक्षा अधिक पॅनेल रिंगणात राहण्याची शक्यता कायम आहे.

येत्या दोन दिवसात माघारीनंतर चित्र स्पष्ट होईल. सध्या अनेक इच्छुक उमेदवारांनी आपापल्या पातळीवर सभासदांशी संपर्क,बैठका आणि सभासदांच्या गाठीभेटींना सुरुवात केली आहे.मात्र,कोणत्या पक्षाचा कोणता उमेदवार अंतिम पॅनेलमध्ये राहणार,कोण कोणासोबत जाणार आणि कोणत्या ठिकाणी स्थानिक पातळीवर आघाडी होणार,याचे चित्र अद्याप पूर्णपणे स्पष्ट झालेले नाही.उमेदवारी अर्जांची संख्या मोठी असल्याने माघारीच्या टप्प्यानंतरच निवडणुकीचे अंतिम राजकीय चित्र स्पष्ट होणार आहे.अर्ज माघारी प्रक्रियेचा आज शेवटचा दिवस असून त्यानंतर प्रत्यक्ष रिंगणात किती पॅनेल आणि किती उमेदवार राहतात,याकडे सभासदांचे लक्ष लागले आहे.त्यामुळे सध्या सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत 'आघाडी होणार की स्वबळावर लढत होणार?', 'बिनविरोधाचा मार्ग निघणार की निवडणुकीचा सामना रंगणार?' या प्रश्नांची चर्चा सुरू आहे.आगामी काही दिवसांत होणाऱ्या बैठका,गाठीभेटी आणि माघारीच्या प्रक्रियेनंतरच सोमेश्वरच्या राजकीय मैदानातील अंतिम समीकरण स्पष्ट होणार आहे.

न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

■ कवठे यमाई (दै. संध्या)



रयत शिक्षण संस्थेच्या कवठे यमाई येथील न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्सच्या इयत्ता सातवी व आठवीतील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील एकूण नऊ विद्यार्थ्यांनी गुणवत्तेत स्थान मिळवत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

या यशाबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक,पालक आणि शाळा व्यवस्थापन यांच्या प्रयत्नांमुळे हे यश मिळाले असल्याचे शाळेच्या वतीने सांगण्यात आले.सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा शॉल,श्रीफळ,फेटा बांधून काल दि. २९ ला विद्यालयात झालेल्या कार्यक्रमात यथोचित सत्कार करण्यात येऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धात्मक परीक्षांची तयारी तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जात असल्याची माहिती प्राचार्य शिवराम मुंजवाडे यांनी दिली. "विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास" या ध्येयातून विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन केले जात असल्याचे यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षक सौ.एस ए थोरात,सौ.यु व्ही.पवार,एच एस दाभाडे या शिक्षकांनी आवर्जून सांगितले. शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविणाऱ्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, मार्गदर्शक शिक्षक,शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन करून शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

चाकण भागात महामार्गालगत कचऱ्याचे साम्राज्य



■ चाकण (दै. संध्या)

चाकण परिसरातील विविध प्रमुख चौक, उड्डाणपूल आणि रस्त्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणावर कचरा टाकण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे परिसरात दुर्गंधीचे प्रचंड साम्राज्य पसरले आहे. वाढत्या दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, अस्वच्छतेमुळे त्रस्त झालेल्या स्थानिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. चाकण येथील आंबेठाण चौकातील उड्डाणपुलाजवळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानाबाहेर सेवा अंतर्गत रस्त्याच्या कडेला काही नागरिक रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत कचरा फेकून देत आहेत. तसेच स्वप्ननगरी, खराबवाडी, वाघजाई नगर व एकतानगर भागात देखील नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर कचरा रस्त्यावर टाकला जात आहे. येथील जय भारत चौकालगत असलेल्या पीडब्ल्यूडीच्या मैदानाच्या कोपऱ्यावर दररोज कचऱ्याचे ढीग साचत आहेत. एवढेच नव्हे तर जय भारत चौक ते भाजी मार्केट दरम्यान असलेल्या दुभाजकावर सकाळी कामावर जाणारा कामगार वर्ग कचरा फेकून देत असल्याचे पाहायला मिळत आहे. रस्त्याच्या कडेला आणि मुख्य चौकांत साचणाऱ्या या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून मोकाट जनावरांचा आणि श्वानांचा वावर वाढला आहे. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असून रोगराई पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

तीन अल्पवयीन मुलांना शोधण्यात जुन्नर पोलिसांना यश

■ नारायणगाव(दै. संध्या)

जुन्नर येथील कृष्णराव मुंढे विद्यालयाच्या वस्तीगृहातून बेपत्ता झालेल्या तीन अल्पवयीन मुलांचा जुन्नर पोलिसांनी अखेर यशस्वी शोध घेतला आहे. गेल्या २६ दिवसांपासून सुरू असलेल्या या शोधमोहिमेला यश आले असून, पोलिसांनी या तिन्ही मुलांना चाकण येथून ताब्यात घेतले आणि सुखरूपपणे त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले आहे. १ सप्टेंबर रोजी ओंकार माळी, ज्ञानेश्वर दाभाडे आणि सौरभ डामसे सर्व रा. कोपरे मांडवे, जुन्नर ही शाळकरी मुले अचानक वस्तीगृहातून निघून गेली होती. मुले बेपत्ता झाल्याचे समजताच ५ सप्टेंबर रोजी त्यांच्या पालकांनी जुन्नर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. मुलांचा कोणताही सुगावा लागत नसल्याने पोलीस प्रशासन आणि पालकांची चिंता वाढली होती. या घटनेचे गांभीर्य ओळखून जुन्नर पोलीस उपअधीक्षक धनंजय पाटील आणि पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष शोध पथक तयार करण्यात आले. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मोरे, संतोष पठारे, अजित गेंगजे, समाधान ताडगे, महेश गायकवाड, विजय जंगम, श्रीराम शिंदे, कैलास केंद्रे, अंमलदार अनिल लोहकरे, दीपक वनवे, शिंदे आणि भागवत यांचा समावेश होता. तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक पद्धतींचा वापर केला. तसेच अनेक ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. मुलांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी एसटी बस स्थानके, मित्र व शिक्षकांकडे कसून चौकशी केली होती. पोलीस आपल्या मागे असल्याचे आणि प्रशासकीय कारवाई सुरू झाल्याचे समजल्यामुळे ही मुले घाबरली होती आणि स्वतःची ओळख लपवून वेगवेगळ्या ठिकाणी फिरत होती. कधी कल्याण, कधी मुंबई, तर कधी पुणे आणि अखेर चाकण. सर्वात मोठे आव्हान होते ते म्हणजे मुलांनी आपल्या कुणाही नातेवाईकाशी संपर्क ठेवला नव्हता.

गुंतवणुकीसाठी स्थानिक पतसंस्थांना प्राधान्य देण्याचे आमदार शरद सोनवणे यांचे आवाहन

■ नारायणगाव(दै. संध्या)



इतर राज्यातील अनोळखी मल्टिस्टेट पतसंस्था आपल्या भागात शाखा सुरू करून जास्त व्याजदर व अन्य प्रलोभने दाखवून ठेवीदारांना आकर्षित करतात. मात्र, या संस्था स्थानिक पातळीवर कर्ज वाटप करत नाहीत आणि काही वर्षांनंतर बंद पडतात. त्यामुळे ठेवीदारांचे पैसे सुरक्षित राहण्यासाठी त्यांनी आपल्या भागातील स्थानिक पतसंस्था व बँकांना गुंतवणुकीसाठी प्राधान्य द्यावे. तसेच मल्टिस्टेट पतसंस्थेसोबत आर्थिक व्यवहार करताना नागरिकांनी सजग राहावे, असे आवाहन आमदार शरद सोनवणे यांनी केले आहे.

विक्रांत पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. ही सभा संस्थेचे अध्यक्ष संतोष वाजगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याप्रसंगी ग्रामीणोन्नती मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सुजित खैरे यांचा आणि पतसंस्थेचे अध्यक्ष संतोष वाजगे यांच्यासह गुणवंत अधिकारी, कर्मचारी व सभासदांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला तालुका फेडरेशनचे अध्यक्ष अमित बेनके, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष खैरे, शिवसेनेचे तालुका प्रमुख योगेश पाटे, उद्योजक विजय गुंजाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विकास देरेकर, लाला बँकेचे संचालक अशोक गांधी, सरपंच डॉ. शुभदा आव्हाड, विक्रांत पतसंस्थेचे उपाध्यक्ष सुजित खैरे, सचिव नीलेश गोरडे, संचालक जितेंद्र वाजगे, सचिन गायकवाड, मुकेश वाजगे, अजित वाजगे, संजय बनकर, संतोष बाळसराफ, डॉ. प्रदीप जोशी, माया डोंगरे, सुजाता कटारिया, अनिता आव्हाड, संजय चोरडिया, मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल शिंदे, कायदेशीर सल्लागार विजय वाजगे, कल्याणी वाजगे आदी मान्यवर व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे सचिव निलेश गोरडे यांनी सांगितले की, थकीत कर्ज वसुली आता वेगाने सुरू आहे. कर्जदाराने वेळेत कर्ज न भरल्यास ते भरण्याची कायदेशीर जबाबदारी जामीनदारावर येते. त्यामुळे सभासदांनी जामीनदार राहताना योग्य ती काळजी घ्यावी, असा इशारा त्यांनी दिला.

नारायणगाव येथे कृषिरत्न डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्यावर व्याख्यान

■ नारायणगाव(दै. संध्या)



नारायणगाव येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जि. अमरावती यांच्या वतीने लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत 'कृषिरत्न डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नारायणगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी होते. प्रमुख उपस्थिती म्हणून वरुड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पांडे, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. चत्रभूज कदम उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. दिलीप पांडे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व कृषी क्षेत्रातील योगदानाची माहिती दिली.

प्रमुख वक्ते डॉ. चत्रभूज कदम यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अत्यंत संघर्षमय परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला. त्यांचे शैक्षणिक व सामाजिक विचार आजच्या बदलत्या परिस्थितीतही तितकेच उपयुक्त आणि मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी यांनी, "नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवरही डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक विचारांची नितांत आवश्यकता आहे," असे प्रतिपादन केले. यावेळी प्रमुख अतिथींचा परिचय प्रा. आकाश कांबळे यांनी करून दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन रुपनर यांनी केले, तर आभार प्रदर्शन इतिहास विभागाच्या प्रा. सुरक्षा पाटील यांनी केले.तसेच या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात पण महत्वाचे



उत्तराखंडमधील शिक्षकांना मिळणार कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रशिक्षण

पुणे : दैनिक संध्या

उत्तराखंड राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशन यांनी राज्यातील शिक्षकांची कृत्रिम बुद्धिमत्ता विषयातील साक्षरता आणि कौशल्य वाढविण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. या भागीदारीमुळे राज्यातील शिक्षकांना आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा अध्यापन प्रक्रियेत प्रभावी वापर करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि साधने उपलब्ध होणार आहेत. या कराराअंतर्गत एससीईआरटी उत्तराखंडचा माहिती-तंत्रज्ञान विभाग आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशन संयुक्तपणे शिक्षकांसाठी शैक्षणिक सामग्री, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि तांत्रिक सहाय्य विकसित करणार आहेत. विकसित करण्यात येणारे अभ्यासक्रम दीक्षा, यूके ई-सृजन आणि मिशन कर्मयोगी यांसारख्या डिजिटल व्यासपीठांवर उपलब्ध करून देण्याची योजना आहे. कोटक एज्युकेशन फाउंडेशनच्या सहकार्याने उत्तराखंडमधील शिक्षकांसाठी 'एआय कोर्स फॉर एज्युकेटर्स' हा अभ्यासक्रम स्थानिक गरजांनुसार विकसित करून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. या माध्यमातून शिक्षकांना अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा अर्थपूर्ण वापर करण्याबरोबरच विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे आणि त्यांच्या शिकण्याच्या विविध गरजांनुसार अध्यापन करण्यास मदत होणार आहे. या कार्यक्रमामुळे धड्यांचे नियोजन, मूल्यांकन तसेच विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्यापन यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी शिक्षकांचा आत्मविश्वास आणि क्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

2027 – विकलांग प्रतिभावान व्यक्तींच्या गौरवासाठी नामांकन खुले

मुंबई : दैनिक संध्या

कविनकेयर प्रा. लि. आणि एबिलिटी फाउंडेशन अभिमानाने 25 वे कविनकेयर एबिलिटी अवॉर्ड्स 2027 साठी नामांकन मागवत आहेत. हा भारतातील सर्वात प्रतिष्ठित मंचांपैकी एक असून, तो विकलांग व्यक्तींच्या असामान्य कामगिरीचा सन्मान करतो. यावर्षी, इच्छुक व्यक्ती स्वतःचे नामांकन www.abilityfoundation.org किंवा www.cavinkare.com या संकेतस्थळांवर मंगळवार, 27 ऑक्टोबर 2026 पर्यंत सादर करू शकतात. एमिनन्स (Eminence) श्रेणीतील विजेत्यास ₹2 लाखांचे रोख पारितोषिक, तर तीन मास्टरी(Mastery) पुरस्कारांच्या प्रत्येक विजेत्यास ₹1 लाखांचे रोख पारितोषिक दिले जाईल. नामांकन फॉर्म आणि सविस्तर माहिती याच संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क करा: +91 98400 55848/ +918939675544. 2003 पासून, कविनकेयर एबिलिटी अवॉर्ड्स ने आतापर्यंत देशभरातील 106 उत्कृष्ट व्यक्तींना गौरविले आहे. या सर्वांनी आपल्या जिद्दीने, कर्तृत्वाने आणि चिकाटीने केवळ अडथळे पार केले नाहीत तर सामाजिक दृष्टिकोन देखील बदलला आहे. 25 व्या वर्षात प्रवेश करताना हे पुरस्कार पुन्हा एकदा प्रेरणादायी कथा आणि असामान्य यश देशासमोर आणत आहेत. कविनकेयर एबिलिटी अवॉर्ड फॉर एमिनन्स – अशा विकलांग व्यक्तीचा सन्मान करण्यासाठी, ज्यांनी एखाद्या संस्थेची स्थापना केली असून समाजावर परिवर्तनकारी परिणाम घडवला आहे. कविनकेयर एबिलिटी मास्टरी अवॉर्ड्स – अशा विकलांग व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी, ज्यांनी आपल्या क्षेत्रात उत्कृष्टता आणि विशेष ओळख मिळवली आहे. पुरस्कार विजेत्यांना रोख पारितोषिक, प्रशस्तिपत्र आणि ट्रॉफी देण्यात येईल जी त्यांच्या धैर्य व योगदानाचे प्रतीक असेल.आयोजकांनी सांगितले की हे पुरस्कार फक्त वैयक्तिक यशाला दाद देत नाहीत, तर समाजात विकलांगतेबद्दलचा दृष्टिकोन बदलण्याचा प्रयत्नही करतात, जेणेकरून प्रत्येक स्तरावर समावेशकता व सशक्तीकरणास चालना मिळेल. पात्र उमेदवार भारतीय नागरिक असावेत आणि त्यांना विकलांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, 2016 अंतर्गत मान्यताप्राप्त विकलांगता असावी. कोणतीही व्यक्ती स्वतःला नामांकन देऊ शकते किंवा इतरही त्यांना नामांकन देऊ शकतात. निवड प्रक्रियेत अर्जांची तपासणी, मुलाखती, स्थळभेट आणि प्रतिष्ठित निर्णायक मंडळाद्वारे अंतिम मूल्यांकन यांचा समावेश आहे.



खालुंब्रे येथे जोपादेवी सहकारी सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळमेळीत

चाकण : दैनिक संध्या

खेड तालुक्यातील खालुंब्रे येथील श्री जोपादेवी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. जोपादेवी सहकारी सोसायटीचे चेअरमन ईश्वर राणू बोत्रे यांच्या अध्यक्षतेखाली खालुंब्रे ग्रामपंचायतीच्या कार्यालयात सभासदांसाठी झालेली ही वार्षिक सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ईश्वर बोत्रे, उपाध्यक्षा भागुबाई बोत्रे, सचिव रोहिदास गव्हाणे, संचालक अमोल पवार, चंद्रकांत तुळवे, राजू बोत्रे, राजेंद्र बोत्रे, बाबाजी गुंड, ज्ञानेश्वर बोत्रे, श्यामराव बोत्रे, धनंजय बोत्रे, लंकाबाई शिंदे, हिरामण बोत्रे, राजाराम येळवंडे, सर्जेराव बोत्रे, गणेश निकम आदी उपस्थित होते. श्री जोपादेवी सहकारी सोसायटीचे संचालक अमोल पवार यांनी यावेळी या सभेत मागील सभेचे प्रोसेडिंग वाचून कायम केले. मार्च २०२६ अखेर संपलेल्या वर्षाची हिशोब पत्रके, तेरीज पत्रक व ताळेबंद पत्रक वाचून कायम करण्यात आले. अंदाज पत्रकास मंजुरी, कर्ज व थकबाकीबाबत माहिती घेऊन दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे जादा झालेल्या खर्चाला मंजूर देण्यात आली. चंद्रकांत तुळवे यांनी आभार मानले.

कीर्तनाच्या माध्यमातून पर्यावरण जनजागृतीचा संदेश

■ दर्यापूर (दै. संध्या)

"झाड जगवणे हीच खऱ्या अर्थाने मृतात्म्याला श्रद्धांजली आहे. आपण लावलेले एक झाड उद्या कुणाच्या माथ्यावर सावली देईल, कुणाला गोड फळ देईल, एखाद्या पक्ष्याला निवारा देईल आणि असंख्य जीवांना शुद्ध हवा देईल..." या हृदयस्पर्शी शब्दांतून ह.भ.प. श्री. रामकृष्ण महाराज अकोटकर यांनी बोराळा येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

दर्यापूर तालुक्यातील बोराळा येथे स्व. श्री. प्रकाशराव विश्वनाथराव चौधरी यांच्या तेरवीच्या कार्यक्रमाला अनोखी पर्यावरणपूरक जोड देण्यात आली. पारंपरिक धार्मिक विधींसोबत ह.भ.प. श्री. रामकृष्ण महाराज अकोटकर यांच्या भावपूर्ण कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. या कीर्तनातून त्यांनी उपस्थित ग्रामस्थ, नातेवाईक आणि पाहुण्यांना पर्यावरण संरक्षणाची जाणीव करून देत, "प्रत्येक कुटुंबाने आपल्या आनंदाच्या अथवा दुःखाच्या प्रसंगी किमान एक तरी झाड लावून ते जगवावे," असे भावनिक आवाहन केले. कीर्तनातून संतविचारांचा दाखला देत महाराज म्हणाले की, संत तुकाराम महाराजांनी वृक्ष-वेली, वनचर आणि निसर्गाशी असलेले माणसाचे अतूट नाते अधोरेखित केले आहे. वृक्ष-वेली आणि वनचर हे आपले सगेसोयरे आहेत, ही संतांची शिकवण आजच्या पर्यावरणीय संकटाच्या काळात अधिकच मोलाची ठरते. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानातील "भूतां परस्परे जडो, मैत्र जीवांचे" ही प्रार्थना केवळ मानवी सुखापुरती मर्यादित नसून सर्व जीवांमध्ये मैत्री, करुणा आणि विश्वकल्याणाची भावना जागवणारी आहे. तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेत ग्रामस्वच्छता, ग्रामविकास, निसर्गसंवर्धन आणि सार्वजनिक संपत्तीचे जतन यांना सामाजिक जबाबदारीशी जोडले आहे. संतांच्या या विचारांना कृतीची जोड देत चौधरी परिवाराने आज समाजासमोर एक सकारात्मक आदर्श निर्माण केला असल्याचे त्यांनी सांगितले.




तेरवीसाठी आलेल्या पाहुण्यांना विविध वृक्षांची रोपे प्रेमपूर्वक भेट देण्यात आली. यामध्ये ७१ बेलवृक्षांची रोपे, ७१ तुळशीची रोपे, ७१ सीताफळ, ७१ आंबा, ७१ फणस, ७१ पेरू, ७१ कवठ, ७१ कडुनिंब तसेच चारोळी आदी विविध वृक्षांच्या रोपांचा समावेश होता. या उपक्रमामुळे तेरवीचा कार्यक्रम हा केवळ एका कुटुंबाचा शोकप्रसंग न राहता, पर्यावरण संवर्धनाची सामाजिक चळवळ बनविण्याचा प्रयत्न ठरला. यावेळी पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे चिरंजीव अरुणभाऊ सपकाळ, श्रीमती उषा प्रकाशराव चौधरी, विजया रोडे, साधना खुळे, निर्मला आखरे, शोभा तायडे, पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ ट्रस्टचे जनसंपर्क अधिकारी मुकेश चौधरी, मंगेश चौधरी, संत गाडगे बाबा बालगृहाचे व्यवस्थापक गजानन देशमुख, राज्य वन्यजीव बोर्डाचे माजी सदस्य यादव तरटे पाटील, डॉ. शिरीष नाईक, सुनील कडू, विनाकायराव कडू, रितेश वानखडे, मनोज पाटील तायडे यांच्यासह गावातील नागरिक, नातेवाईक आणि पाहुणे मोठ्या संख्येने उपस्थित होते. आजच्या काळात झाड लावण्यापेक्षा झाड तोडले जाण्याचे चित्र आपल्या समोर आहे. विकासाच्या नावाखाली असो अथवा अन्य कोणत्याही कारणाने, वृक्षतोड सुरू आहे. अशा परिस्थितीत एखाद्या व्यक्तीच्या स्मृती केवळ अश्रूंनी नव्हे, तर हिरवाईने जपण्याचा संकल्प मी प्रथमच अनुभवत आहे." "स्व. श्री. प्रकाशराव विश्वनाथराव चौधरी यांच्या तेरवीच्या कार्यक्रमाला एका वेगळ्या, समाजोपयोगी आणि पर्यावरणपूरक संकल्पाची जोड देण्यात आली आहे. नातेवाईक व पाहुण्यांना वृक्षांची रोपे भेट देऊन चौधरी परिवाराने पर्यावरणाशी असलेली आपली बांधिलकी कृतीतून जपली आहे. या रोपांचे संवर्धन झाले, तर आज दिलेली ही छोटीशी भेट उद्या मोठ्या हिरवाईत रूपांतरित होईल," अशी भावना पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे चिरंजीव अरुणभाऊ सपकाळ यांनी व्यक्त केली.

'जागतिक पर्यटन दिन' आणि 'जागतिक नदी दिन'

■ चिपळूण : (दै. संध्या)

सध्याच्या परिस्थितीमध्ये पर्यटनाची व्याख्या बदलली आहे. लोकांना सिमेंटची जंगले आणि कृत्रिम रिसॉर्ट्स नको आहेत. त्यांना हेरीटेजसह शुद्ध हवा, संथ वाहणारी नदी आणि शांत समुद्रकिनारा हवा आहे. कोकणातील आंबा, काजू, कोकम, सुपारीच्या बागा ही पर्यटकांची आकर्षणे आहेत.'होमस्टे'मुळे पर्यटकांना खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेता येत आहे. त्याचवेळी स्वच्छ आणि सुंदर म्हणून ओळख असलेले इथले किनारे आणि गावे कचऱ्याच्या विळख्यात अडकत आहेत. कोकणसाठी 'पर्यावरणपूरक विकास' स्वीकारताना 'जबाबदार पर्यटन' संकल्पना रुजवण्याची आवश्यकता आहे. निसर्गसंपदा, सुंदर समुद्रकिनारे आणि संवेदनक्षम जैवविविधता टिकवण्यासाठी हे पाऊल उचलणे आवश्यक आहे, असे मत 'जागतिक पर्यटन दिन' आणि 'जागतिक नदी दिन' पूर्वसंध्येला पर्यटन-पर्यावरण अभ्यासक-साहित्यिक धीरज वाटेकर यांनी व्यक्त केले आहे.



अथांग समुद्रकिनारे, हिरवीगार वनराई, ऐतिहासिक किल्ले, आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा यांमुळे पर्यटकांची पावले कोकणाकडे वळत आहेत. कोकणची स्वतःची एक वेगळी जीवनशैली, दशावतार, जाखडी सारख्या लोककला आणि खाद्यसंस्कृती आहे. कोकणची जैवविविधता संवेदनशील आहे. समुद्रकिनाऱ्यांवर होणारी प्लास्टिकची गर्दी, कांदळवनांचे (मॅन्ग्रोव्हज) नुकसान, वाढते प्रदूषण यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. वाढत्या पर्यटनासोबत कोकणच्या मूळ सौंदर्याला, पर्यावरणाला तडे जाऊ लागलेत. आपण निसर्गाचा अतिवापर केला, तर भविष्यातील पिढ्यांसाठी काहीच उरणार नाही. त्यामुळे आपल्याला निसर्गपूरक पर्यटनाची प्रारूपे विकसित करावी लागणार आहेत. यासाठी कायद्यांच्या कठोर अंमलबजावणीसह हॉटेल व्यावसायिक, पर्यटक आणि स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वय निर्माण होण्याची आवश्यकता आहे. येणाऱ्या पर्यटकांना 'अतिथी देवो भव' म्हणताना कोकणच्या भूमीलाही 'पवित्र' मानून तसेच वावरण्याची जाणीव करून द्यावी लागणार आहे. कोकणात, पर्यटक आणि पर्यटन व्यावसायिक दोघेही निसर्ग, पर्यावरण आणि स्थानिक संस्कृतीला कोणतीही हानी न पोहोचवता पर्यटनाचा आनंद घेतील असे 'जबाबदार पर्यटन' रुजविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. आपल्याला पर्यटकांमध्ये कचरा व्यवस्थापन आणि निसर्गाचा आदर राखण्याची जाणीव निर्माण करावी लागणार आहे. समुद्रकिनाऱ्यावर कुठेही कचरा टाकणाऱ्यांवर मोठा आर्थिक दंड आकारण्याची आवश्यकता आहे. यासाठी समुद्रकिनाऱ्यांवर 'स्वच्छता व सुरक्षा रक्षक' नेमावे लागतील. कचऱ्याच्या उगमस्थानी असलेल्या हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि होमस्टे धारकांना ओला आणि सुका कचरा वेगळा करणे बंधनकारक करावे लागेल. ओल्या कचऱ्यापासून खत निर्मितीचे प्रकल्प राबवावे लागतील. कोकणात सर्वत्र दर्शनी भागात 'निसर्गाचा आदर करा', 'कचरा कुंडीचा वापर करा' अशा स्वरूपाचे फलक मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत लावण्याची गरज आहे. कोणत्याही पर्यटनस्थळाची कचरा पेलण्याची स्वतःची एक क्षमता असते. पर्यटनाचा आनंद घेताना निसर्गाची हानी होणार नाही, याची जबाबदारी घेण्याची पर्यटकांनी मानसिकता बनवण्याची आवश्यकता आहे. तशी वातावरण निर्मिती आपल्याला कोकणात करावी लागणार आहे. कोकणात प्रवेश करणाऱ्या प्रमुख घाटांवर किंवा टोल नाक्यांवर पर्यटकांच्या वाहनांची तपासणी करून कचरा योग्य त्या ठिकाणी संकलित करता येईल. समुद्रकिनाऱ्यावर, ऐतिहासिक किल्ल्यांवर आणि पर्यटन स्थळांवर क्यूआर कोड लावून पर्यटकांना परिसराचे महत्त्व आणि कचरा न करण्याचे आवाहन करणारा दृकश्राव्य संदेश देता येईल.

कोकणात अलिबाग, मुरुड, दिवेआगर, गुहागर, दापोली, गणपतीपुळे, आंबोली, मालवण, तारकर्ली, वेंगुर्ला यांसारख्या समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची वर्षभर गर्दी असते. स्कूबा डायव्हिंग, वॉटर स्पोर्ट्स आदी उपक्रमांमुळे पर्यटनाला व्यावसायिक स्वरूप आले आहे. 'होमस्टे'च्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे होत असलेले चौपदरीकरण आणि रेल्वे गाड्यांच्या संख्या विस्तारामुळे कोकणात पोहोचणे सोपे झाले आहे. यामुळे पर्यटन वाढण्यासोबत एकेकाळी स्वच्छ आणि सुंदर म्हणून ओळखले जाणारे कोकणातील किनारे आणि गावे हळूहळू कचऱ्याच्या विळख्यात अडकू लागली आहेत. पूर्वी कोकणात येणारा कचरा हा प्रामुख्याने जैविक किंवा विघटनशील स्वरूपाचा असायचा.



पाटणसह पाच तालुक्यांच्या दुष्काळी समावेशासाठी पालकमंत्री देसाईंचा पाठपुरावा

■ मुंबई: (दै. संध्या)

सातारा जिल्ह्यातील पाटण, वाई, सातारा, जावली आणि कोरेगाव या तालुक्यांचा दुष्काळी क्षेत्रात समावेश करून शेतकऱ्यांना दुष्काळी उपाययोजनांचा लाभ द्यावा, अशी मागणी सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे पाठपुरावा केला आहे. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मुख्य सचिवांना आवश्यक कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यात दुष्काळ जाहीर करताना सातारा जिल्ह्यातील माण, खटाव, फलटण, खंडाळा आणि महाबळेश्वर आदी तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र, पाटणसह वाई, सातारा, जावली आणि कोरेगाव या तालुक्यांचा दुष्काळी तालुक्यांच्या यादीत समावेश झालेला नाही. दरम्यान, या तालुक्यांमध्येही पावसाने दीर्घ विश्रांती घेतल्याने शेतीपिकांवर त्याचा परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित तालुक्यांचा दुष्काळी क्षेत्रात समावेश करण्याची मागणी देसाई यांनी केली आहे.

पाटण तालुक्यातील परिस्थिती अधिक गंभीर असल्याचे देसाई यांनी निदर्शनास आणून दिले आहे. तालुक्यात एकूण १४ महसूल मंडळे असून त्यापैकी नऊ महसूल मंडळांमध्ये ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे. उर्वरित पाच महसूल मंडळांमध्ये ८० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस झाला असला, तरी सप्टेंबर महिन्यात पावसाने पूर्णपणे विश्रांती घेतल्यामुळे पिकांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. पावसाअभावी पिके करपण्याच्या मार्गावर असून शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. पाटणप्रमाणेच वाई, सातारा, जावली आणि कोरेगाव तालुक्यांमध्येही पावसाच्या खंडामुळे शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे केवळ पर्जन्यमानाचा विचार न करता पावसाच्या खंडाचा पिकांवर झालेला प्रत्यक्ष परिणाम लक्षात घेऊन दुष्काळी निकषांनुसार या तालुक्यांचा समावेश करण्याची मागणी देसाई यांनी केली आहे. सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी उपाययोजनांचा लाभ मिळावा, यासाठी देसाई यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे ही बाब मांडली.

महाराष्ट्राच्या भक्ती-संगीताचा नवा उत्सव! झी एंटरटेनमेंटच्या 'नादोत्सवम २०२६'ची घोषणा

■ पुणे (दै. संध्या)

अभंग, भारूड, पोवाडा, गोंधळ... महाराष्ट्राची ओळख असलेल्या या कला आजही तितक्याच उत्साहाने जपल्या जात आहेत. याच पारंपरिक कलांना आजच्या नव्या पिढीशी जोडण्यासाठी झी एंटरटेनमेंटने 'नादोत्सवम २०२६' या सांस्कृतिक आणि भक्ती-संगीत महोत्सवाची घोषणा केली आहे. महाराष्ट्रातील सहा शहरांमध्ये होणाऱ्या या महोत्सवात संगीत, लोककला, कथाकथन आणि स्थानिक कलाकारांचा खास मेळ पाहायला मिळणार आहे.

आजच्या काळात पारंपरिक कलांना नव्या अंदाजात प्रेक्षकांसमोर आणण्याचा 'नादोत्सवम'चा प्रयत्न आहे. अभंग, भजन, कीर्तन, भारूड, पोवाडा, गोंधळ यांसोबतच वेगवेगळ्या भागांतील लोकसंगीत आणि नृत्यप्रकारही या महोत्सवात पाहायला मिळतील. विशेष म्हणजे, प्रत्येक शहराची खासियत आणि तिथली लोककला यावरही भर दिला जाणार आहे.

या महोत्सवातील खास आकर्षण असणार आहे 'अभंग रिपोस्ट'. महाराष्ट्राच्या भक्तीपरंपरेतील लोकप्रिय अभंगांना आजच्या संगीताचा टच आणि नव्या पिढीला आवडेल अशा परफॉर्मन्ससह सादर केले जाणार आहे. त्यामुळे जुन्या अभंगांचा गोडवा आणि आजच्या संगीताची स्टाईल असे भन्नाट कॉम्बिनेशन प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे.

'नादोत्सवम'च्या प्रत्येक शहरातील कार्यक्रमाला तिथल्या स्थानिक कलेचा खास रंग असणार आहे. ठाण्यात तारपा, पुण्यात जोगवा नृत्य, छत्रपती संभाजीनगरमध्ये स्थानिक लोककला, नाशिकमध्ये पारंपरिक लोकसंगीत, कोल्हापूरमध्ये पोवाडा, तर सोलापूरमध्ये भारूड अशा विविध कलाप्रकारांचा या महोत्सवात समावेश असणार आहे. याशिवाय प्रत्येक शहरातील इतर स्थानिक कलाकारही या मंचावर आपली कला सादर करणार आहेत.

झी मराठीवरील लोकप्रिय कलाकार प्रसाद जवादे आणि शिवानी सोनार या कार्यक्रमांचं सूत्रसंचालन करणार आहेत.



'सा रे ग म प'मधील नव्या गायक-कलाकारांनाही या मंचावर आपली कला दाखवण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे पारंपरिक कलाकारांसोबतच नव्या पिढीतील टॅलेंटही या महोत्सवात पाहायला मिळणार आहे. झी मराठी, झी २४ तास, मराठी झी५ आणि झी टॉकीज या उपक्रमाशी जोडलेले आहेत.

'नादोत्सवम २०२६'ची सुरुवात ३१ ऑक्टोबर रोजी ठाण्यातून होणार आहे. त्यानंतर २१ नोव्हेंबर रोजी पुणे, २८ नोव्हेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर, ५ डिसेंबर रोजी नाशिक, १२ डिसेंबर रोजी कोल्हापूर आणि १९ डिसेंबर रोजी सोलापूर येथे हा महोत्सव रंगणार आहे.


या उपक्रमाबद्दल झी मराठी, झी टॉकीज व मराठी झी ५ च्या बिझनेस हेड व चीफ चॅनेल ऑफिसर हेमा व्ही आर म्हणाल्या, "झी मराठी हे महाराष्ट्रातील प्रेक्षकांसाठी केवळ मनोरंजनाचं माध्यम नसून त्यांच्या कुटुंबाचा एक भाग आहे. महाराष्ट्रातील स्थानिक कलाकार आणि त्यांच्या टॅलेंटला व्यासपीठ देण्याची परंपरा झी मराठीने कायम जपली आहे. 'नादोत्सवम'च्या माध्यमातून हीच नाळ आणखी घट्ट करत आम्ही महाराष्ट्रातील निवडक शहरांमध्ये पोहोचत आहोत. प्रत्येक शहराची स्वतःची ओळख आणि तिथल्या कलाकारांची वेगळी खासियत आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्या शहरात, त्यांच्या लोकांसमोर परफॉर्म करण्याची संधी देणं आमच्यासाठी महत्त्वाचं आहे. 'सा रे ग म प'च्या माध्यमातूनही आम्ही महाराष्ट्रातील घराघरातलं आणि स्थानिक टॅलेंट सातत्याने शोधत आलो आहोत आणि त्यांना मोठं व्यासपीठ दिलं आहे. 'नादोत्सवम'च्या माध्यमातून हेच कलाकार आपल्या शहरात स्टारप्रमाणे परफॉर्म करताना पाहाणं ही एक खास पर्वणी असेल."

यूथ बिझनेस हेड अलंकार पाठारे म्हणाले, "'नादोत्सवम'ची कल्पना आजच्या तरुण पिढीचा आपल्या मुळांशी असलेला कनेक्ट आणि त्यांची मॉडर्न म्युझिकची आवड या दोन्ही गोष्टी एकत्र आणण्याच्या विचारातून आली आहे. आजचा तरुण पारंपरिक अभंग आणि आपल्या संस्कृतीकडे नव्या नजरेने पाहतोय आणि त्याच्याशी स्वतःच्या पद्धतीने कनेक्ट होतोय.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. ०१ ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



तस्वीर तेरी दिल मे कार्यक्रमातुन रसिकांनी अनुभवली लतादीदींची सुरेल गाणी

सासवड : दैनिक संध्या

साथी रे.. तुझ बिन जिया उदास रे... घडी घडी मोरा दिल धडके..तस्वीर तेरी दिल में.. मोसम बिता जाय अशा लता मंगेशकर यांच्या विविध सुरेल गीतांनी सासवडची सोमवारची संध्यकाळ सुरमय होऊन गेली. स्वर सम्राज्ञी लता मंगेशकर यांचा वाढदिवस आणि आघाडीचे संगीतकार सलील चौधरी यांच्या जन्म शताब्दी वर्षाच्या निमित्ताने पुरंदर कला मंचचे मोहन बागडे यांनी "तस्वीर तेरी दिलं में" या कार्यक्रमांतर्गत लताजींच्या ध्वनी मुद्रीकेवरील गीत सादरीकरणाचा सुंदर कार्यक्रम केला. येथील मेघमल्हार संगीत विदयालयात झालेल्या या संगीत मैफिलीला प्रसिद्ध तबला वादक व संशोधक पंडीत उमेश मोघे, जेष्ठ संगीतकार निनाद अजगावकर, जेष्ठ कथ्थक नृत्यगुरु जयश्री मोघे यांसह अनेक रसिकजण मोठ्या संख्येने उपस्थित होते. सन १९५३ पासुन सलीलदा यांनी संगीतबद्ध केलेली व लताजींनी अजरामर केलेली अनेक गीते या वेळी सादर करण्यात आली. गीताची पार्श्वभूमी व अन्य सहिंता याचे अचूक सूत्रसंचालन मोहन बागडे यांनी केले तर त्यांचे बंधू अमोल व गणेश यांनी रेकॉर्डिंगसाठी मोलाची मदत केली. पंडीत उमेश मोघे व संगीतकार अजगावकर यांनीही अधून मधुन काही किस्से, प्रसंग सांगत कार्यक्रमात रंगत आणली अजगावकर यांनी आली कुठूनशी कानी हे गीत सादर केले मंद दिव्यांच्या प्रकाशातील सुरेल गाणी ऐकण्याचा नितांत सुंदर कार्यक्रम या निमित्ताने सर्वानी अनुभवला. अडीच तासांहुन अधिक काळ सुरु असलेल्या या मैफिलीची जागो मोहन प्यारे गीताने सांगता झाली. सतीश पाटील, अमोल बेलसरे, डॉ घनशाम खांडेकर, अरविंद इंदलकर, तानाजी सातव, कल्याणी चिंबळकर, संजय काटकर, हेमंत ताकवले, अरविंद चिव्हे, स्नेहल देशपांडे, मीना जोशी, शिल्पा हेंद्रे, निवृत्ती बागडे, किरण पुरंदरे, इंदिरा पवार, माऊली गिरमे, सुनील हेंद्रे, अनिल कदम, कांचन तळेकर यांच्यासह अनेक संगीतप्रेमी या प्रसंगी उपस्थित होते.

संत सावतामाळी महाराज वधू वर सूचक मंडळाची कार्यकारिणी जाहीर

चाकण : दैनिक संध्या

येथील श्री संत सावतामाळी महाराज वधू - वर सूचक मंडळाच्या नूतन कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, अध्यक्षपदी शोभा शेवकरी यांची, तर उपाध्यक्षपदी मिना गोरे यांची व सचिवपदी गोरक्षनाथ कांडगे यांची निवड करण्यात आली आहे. वधू - वर सूचक मंडळाच्या माध्यमातून समाजातील विवाह इच्छुक युवक - युवतींसाठी योग्य स्थळे उपलब्ध करून देणे, कुटुंबांचा संपर्क घडवून आणणे आणि विवाह जुळविण्याच्या प्रक्रियेत सहकार्य करण्याचे कार्य अविरतपणे सुरू आहे. अध्यक्षपदी शोभा शेवकरी, उपाध्यक्षपदी मिना गोरे व सचिवपदी गोरक्षनाथ कांडगे यांची निवड झाल्याने वधू वर सूचक मंडळाच्या कार्याला अधिक गती व बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या निवडीमुळे समाजातील विवाह इच्छुक तरुण - तरुणी आणि त्यांच्या पालकांना मोठा दिलासा व लाभ मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. नूतन पदाधिकाऱ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. शोभा शेवकरी व गोरक्षनाथ कांडगे यांनी सांगितले की," वधू वर सूचक मंडळाच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरातील नागरिक एकत्रित येत असतात. अशा उपक्रमांमधून चांगल्या कामांना चालना मिळते. सर्वसामान्य नागरिकांनी अशा कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे ही खरोखरच काळाची गरज आहे."



सासवडच्या ग्रामीण रुग्णालयात ८बालकांवर टंगटायची यशस्वी शस्त्रक्रिया

सासवड : दैनिक संध्या

सासवड येथील ग्रामीण रुग्णालयात आठ बालकांवर टंगटायच्या म्हणजेच जीभ बांधणे ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिक्षक डॉ गजानन अकमार यांनी दिली आहे सरकारच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम म्हणजेच (आर बी एस के) अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आल्याचे डॉ अकमार यांनी सांगितले. सदरच्या मोहिमेसाठी दौंड उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ सचिन गुजर शिक्रापूर ग्रामीण रुग्णालयाच्या डॉ अर्चना झेंडे, यवत ग्रामीण रुग्णालयाचे भुलतज्ञ डॉ बालाजी कदम यांसह सासवड ग्रामीण रुग्णालयाचे अन्य डॉक्टर्स, कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले असेही डॉ गजानन अकमार यांनी सांगितले. डॉ रामचंद्र हंकारे, डॉ अंबादास देवमाने यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळे हा शासकीय कार्यक्रम यशस्वी होण्यास मदत झाली असे डॉ.अकमार म्हटले.

आरटीई प्रवेशात बनावट कागदपत्रांचा आरोप; १४ पालकांवर गुन्हा

आळंदी : दैनिक संध्या

आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ अंतर्गत प्रवेश मिळविण्यासाठी प्रत्यक्ष वास्तव्य नसलेल्या पत्त्याचे कथित बनावट रहिवासी कागदपत्रे सादर केल्याच्या आरोपावरून १४ पालकांविरुद्ध खेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित पालकांनी खोटे रहिवासी पुरावे सादर करून शासनाची दिशाभूल व फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती खेड अमोल विजय जंगले (वय ३६ यांनी खेड पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. पोलिसांकडे दाखल फिर्यादीनुसार, मार्च ते मे २०२६ या कालावधीत आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी पालकांनी पंचायत समिती खेड येथील तालुकास्तरीय समितीकडे अर्ज केले होते. अर्जांसोबत सादर केलेल्या रहिवासी पुराव्यांची तपासणी करताना काही कागदपत्रांबाबत संशय निर्माण झाला. आळंदी येथील डॉ.विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूलमध्ये प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या पालकांमध्ये गणेश अरुण साळुंखे, सतीश दत्तात्रय गुंड, उत्तरेश्वर आश्रुबा गोचडे, योगेश बबन सातपुते, समीर रामचंद्र गोरे, राहुल भगवान चौधरी, वैभव होणाजी मोहिते, अजय मच्छिंद्रनाथ विरकर, संदीप दादा शिंदे आणि रमाकांत आनंदराव चव्हाण यांचा समावेश आहे. हे पालक केळगाव, हनुमानवाडी व आळंदी परिसरातील रहिवासी असल्याचे अर्जात नमूद करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

बांधकाम क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रणासाठी प्रभावी अंमलबजावणी आवश्यक: श्रावण हर्डीकर

केंद्रीय अपारंपरिक ऊर्जा मंत्रालयाअंतर्गत एकदिवसीय 'ग्रिहा रिजनल कॉन्क्लेव्ह'चे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

"वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर बांधकाम क्षेत्रातील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पर्यावरणीय नियमांची प्रभावी अंमलबजावणी, नियमित देखरेख आणि शाश्वत बांधकाम पद्धतींचा अवलंब आवश्यक आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रवण हर्डीकर यांनी केले. शाश्वत पर्यावरणपूरक बांधकामांना प्राधान्य ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

केंद्रीय अपारंपरिक ऊर्जा मंत्रालयाच्या ग्रीन रेटिंग फॉर इंटिग्रेटेड हॅबिटॅट असेसमेंट (ग्रिहा), दी एनर्जी अँड रिसोर्स इन्स्टिट्यूट (टेरी) व नॉलेज पार्टनर सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्ह (एसआय) या संस्थांच्या वतीने आयोजित 'ग्रिहा रिजनल कॉन्क्लेव्ह'च्या उद्घाटनप्रसंगी हर्डीकर बोलत होते. 'कमी कार्बन उत्सर्जनाचा भविष्यकालीन मार्ग: बांधकामांपासून पायाभूत सुविधांपर्यंत' अशी या परिषदेची संकल्पना होती.

कोरेगाव पार्क येथील हॉटेल कॉनरॅडमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचे (आयसर) संचालक डॉ. सुनील भागवत, पर्यावरण तज्ज्ञ डॉ. प्रसाद मोडक, 'ग्रिहा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शेठ, 'टेरी'च्या शाश्वत बांधकाम विभागाच्या संचालिका शबनम बस्सी, व्ही. के. ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक हृषीकेश कुलकर्णी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे माजी मुख्य अभियंता विवेक खरवडकर, बांधकाम व्यावसायिक सर्वेश जावडेकर, आर्कि. अनुजा पंडित, सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हच्या विश्वस्त अनघा परांजपे -पुरोहित, विजय साने, उपेंद्र देशपांडे, डी. वाय. पाटील महाविद्यालयातील प्रा. दिनेश झोपे, विश्वकर्मा विद्यापीठातील स्कुल ऑफ आर्किटेक्चर अँड प्लॅनिंगच्या अधिष्ठाता डॉ. प्रीती धनवट आदी उपस्थित होते. यावेळी 'ग्रिहा'ने विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे व डी. वाय पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई यांच्याशी सामंजस्य करार केला.

श्रवण हर्डीकर म्हणाले, "शाश्वत विकास हवा असेल, तर प्रत्येकाने पुढाकार घेऊन काम करण्याची आवश्यकता आहे. पर्यावरणपूरक बांधकाम न करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हायला हवी. शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू असल्याने धुळीचे प्रमाण वाढलेले दिसते, त्यावर नियंत्रण येण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी गरजेची आहे."

डॉ. सुनील भागवत म्हणाले, "शाश्वततेच्या दृष्टीने येत्या काळात भारत जगाचे नेतृत्व करू शकतो. शाश्वतता महत्वाची आहेच; पण अर्थशास्त्र आणि मानवी गरजा हे त्यापेक्षाही जास्त महत्वाचे आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक व शाश्वत विकास साधण्यासाठी मोठ्या प्रमाणात संशोधन व नाविन्यपूर्ण उपक्रम करण्याची गरज आहे."

संजय शेठ म्हणाले, "झपाट्याने विकसित होत असलेल्या पुणे शहरात पायाभूत सुविधाही गरजेच्या आहेत. मात्र या सुविधा उभारताना पर्यावरणाची हानी होणार नाही, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. शाश्वत व पर्यावरणपूरक बांधकामांसाठी सर्व घटकांनी पुढाकार घेऊन एकत्रितपणे काम करावे. त्यासाठी ही परिषद नक्कीच मार्गदर्शक ठरेल."

प्रारंभी डॉ. प्रसाद मोडक व अनघा परांजपे-पुरोहित यांनी शाश्वत विकासासाठी पर्यावरणीय मंजुरी व कार्बन उत्सर्जन कमी करण्याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी 'ग्रिहा रेटिंग' मिळालेल्या प्रकल्प आणि शाळांना विशेष सन्मानित करण्यात आले. या निमित्ताने 'ग्रिहा'च्या शिष्टमंडळाने पुण्यातील 'सारथी' या हरित इमारतीला भेट देत पाहणी केली.

'शाश्वततेचा विस्तार: हरित इमारतींपासून ते अनुकूल शहरे आणि पायाभूत सुविधांपर्यंत' आणि 'कमी-कार्बन संक्रमणासाठी वित्तपुरवठा: व्यावसायिक रणनीतीपासून ते कार्बन मूल्यापर्यंत' या विषयावरील चर्चासत्रात तज्ज्ञांनी विचार मांडले. अदिती देव यांनी सूत्रसंचालन केले. शबनम बस्सी यांनी आभार मानले.



विद्या किशोर म्हस्के यांच्या सेवानिवृत्ती सोहळ्याने आठवणींना उजाळा

■ सासवड (दै. संध्या)

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी अँड पॉलिटेक्निक, सासवड येथे महाविद्यालयाच्या मुख्य लिपिका सौ. विद्या किशोर म्हस्के यांच्या ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनिमित्त भावपूर्ण सेवानिवृत्ती व निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपसचिव श्री. लक्ष्मण पवार, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर, खराडीचे प्राचार्य डॉ. अशोक मोसले, डॉ. अश्विनी शेवाळे, तसेच शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी अँड पॉलिटेक्निक, सासवडच्या प्राचार्य डॉ. राजश्री चव्हाण, उपप्राचार्य डॉ. स्मिता पवार व विभागप्रमुख सौ. विशाखा गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सौ. विशाखा गायकवाड यांनी केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सहकाऱ्यांनी सौ. विद्या म्हस्के यांच्या ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. महाविद्यालयीन प्रशासकीय कामकाजात त्यांनी दिलेले योगदान, कर्तव्यनिष्ठा, शिस्तप्रियता, संयमी स्वभाव आणि सहकाऱ्यांशी असलेले आपुलकीचे संबंध यांचा उपस्थितांनी आवर्जून उल्लेख केला.

प्राचार्य डॉ. राजश्री चव्हाण तसेच उपस्थित मान्यवरांनी सौ. विद्या म्हस्के यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचे कौतुक करून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी सौ. म्हस्के यांचा सन्मान करून त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

सौ. विद्या म्हस्के यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयातील ३५ वर्षांच्या सेवाकाळातील विविध अनुभव, सहकाऱ्यांकडून मिळालेले प्रेम व सहकार्य आणि अविस्मरणीय आठवणी भावपूर्ण शब्दांत व्यक्त केल्या. आपल्या सहकाऱ्यांशी असलेले ऋणानुबंध आठवताना वातावरण भावुक झाले.

कार्यक्रमाचा समारोप उपप्राचार्य डॉ. स्मिता पवार यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. उपस्थित सर्वांनी सौ. विद्या म्हस्के यांच्या पुढील आयुष्यासाठी आनंद, उत्तम आरोग्य, समाधान व सुख-समृद्धीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

कृषी तंत्र विद्यालयात साहित्यसम्राटचे २३०वे कविसंमेलन रंगले

■ पुणे (दै. संध्या)

निर्मिती मिडिया सोलुशन आणि समाज विकास संस्था मांजरी या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने जीवन गौरव पुरस्कार सोहळा कृषी तंत्र विद्यालय मांजरी फार्म पुणे येथे आयोजित केला होता.

माजी आमदार गजानन बापू शेवाळे, प्राचार्य अमित पवार सर, महात्मा फुले विद्यानिकेतन संस्थेच्या स्मिताताई वाघ, रतन माळी, सामाजिक कार्यकर्ते योगेश कुलकर्णी, बाळासाहेब विभुते, मुख्य आयोजक देविदास झुरंगे, संपादक शिवराम कांबळे आणि साहित्यसम्राटचे संस्थापक अध्यक्ष विनोद अष्टुळ मंचावर उपस्थित होते. सुप्रसिद्ध विनोदी अभिनेते फु बाई फु फेम माननीय विकास समुद्रे अर्थात दादुस यांना मान्यवरांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजसेवकांना विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये मुख्य आकर्षण चतुरस्त्र कवी विनोद अष्टुळ यांच्या साहित्यसम्राट संस्थेचे २३० वे कवी संमेलन कृषी तंत्र विद्यालयाचे प्राचार्य अमित पवार सर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते. कवी संमेलनामध्ये शेत, जमीन, शेतकरी, आत्महत्या, वृक्ष,पशुपक्षी, पाणी, जीवन, माणुसकी, प्रेम, विद्रोह, प्रबोधन अशा अनेक विषयावरील हास्यमैफलीच्या वातावरणात हे कवी संमेलन रसिकांची मने जिंकणारे ठरले.

कार्यक्रमाचे आभार मुख्य आयोजक शिवराम कांबळे यांनी तर कवी संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन चतुरस्त्र कवी विनोद अष्टुळ यांनी केले.



किस्टोन मध्ये 'रोजगार महाकुंभ २०२६' उत्साहात संपन्न

२६ कंपन्यांचा सहभाग, ६०० हून अधिक उमेदवारांची नोंदणी

■ पुणे (दै. संध्या)

शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना थेट उद्योगविश्वाशी जोडून त्यांच्या कौशल्याला रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने Keystone School of Engineering तर्फे आयोजित करण्यात आलेला 'रोजगार महाकुंभ २०२६' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विविध शैक्षणिक पात्रता आणि शाखांतील युवक-युवतींना एकाच व्यासपीठावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम ठरला.

या रोजगार महाकुंभाचे उद्घाटन डॉ. रावसाहेब लटपटे, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांना बदलत्या उद्योगविश्वातील गरजा, कौशल्यविकास आणि रोजगाराच्या उपलब्ध संधी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या महाकुंभात विविध क्षेत्रांतील २६ नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला, तर कंपन्यांचे ७५ हून अधिक प्रतिनिधी उमेदवारांच्या निवड प्रक्रियेसाठी उपस्थित होते. रोजगाराच्या संधींचा लाभ घेण्यासाठी ६०० हून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली. विविध कंपन्यांच्या आवश्यकतेनुसार उमेदवारांच्या मुलाखती, कौशल्य चाचण्या आणि निवड प्रक्रिया दिवसभर घेण्यात आली. या माध्यमातून १०० हून अधिक रोजगाराच्या ऑफर्स मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

'रोजगार महाकुंभ २०२६'चे वैशिष्ट्य म्हणजे केवळ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांपुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने पाच श्रेणींचा समावेश करण्यात आला होता.

ITI व Diploma, BBA व BCA, Core Engineering, IT Related Engineering आणि Post Graduate या पाचही श्रेणींतील उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता व कौशल्यानुसार विविध कंपन्यांमध्ये संधी उपलब्ध झाल्या.

यामुळे पारंपरिक अभियांत्रिकी क्षेत्राबरोबरच IT, व्यवस्थापन, संगणक अनुप्रयोग, तांत्रिक तसेच इतर विविध क्षेत्रांमध्ये करिअरच्या संधी शोधणाऱ्या युवकांना एकाच ठिकाणी अनेक पर्याय उपलब्ध झाले.



या भव्य रोजगार महाकुंभाच्या यशस्वी आयोजनामध्ये १०० हून अधिक विद्यार्थी स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. उमेदवारांची नोंदणी, मार्गदर्शन, कंपनीनुसार उमेदवारांचे नियोजन, मुलाखतींचे व्यवस्थापन, कंपनी प्रतिनिधींचे समन्वय आणि कार्यक्रमातील विविध व्यवस्थापनाची जबाबदारी विद्यार्थी स्वयंसेवकांनी प्रभावीपणे पार पाडली.

तसेच ३० हून अधिक स्टाफ समन्वयकांनी संपूर्ण कार्यक्रमाच्या नियोजनात आणि अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावली. मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या उमेदवारांचे व्यवस्थापन आणि विविध कंपन्यांच्या निवड प्रक्रियेचे सुरळीत आयोजन करण्यासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले होते.

आजच्या स्पर्धात्मक रोजगार बाजारपेठेत केवळ पदवीपेक्षा कौशल्य, तांत्रिक ज्ञान, संवादकौशल्य आणि उद्योगाच्या गरजांनुसार स्वतःला अद्ययावत ठेवणे महत्त्वाचे ठरत आहे. हीच गरज लक्षात घेऊन 'रोजगार महाकुंभ २०२६' च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याची आणि आपल्या कौशल्यांचे सादरीकरण करण्याची संधी मिळाली.

या उपक्रमामुळे शैक्षणिक संस्था, विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्र यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांना रोजगाराच्या उपलब्ध संधींची माहिती मिळण्याबरोबरच प्रत्यक्ष निवड प्रक्रियेचा अनुभवही मिळाला.

'रोजगार महाकुंभ २०२६'च्या यशस्वी आयोजनासाठी Keystone School of Engineering चे प्राचार्य Dr. Sandeep Kadam, Founder Director Prof. Yashodhan Soman, Director Dr. Prashant Kasabe आणि Director Ankit Lunawat यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच Dean – Training & Placement विपुल महिंद्रकर यांच्या नेतृत्वाखाली रोजगार महाकुंभाचे नियोजन व समन्वय करण्यात आला. स्टाफ समन्वयक आणि विद्यार्थी स्वयंसेवकांच्या अथक प्रयत्नांमुळे संपूर्ण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.